# मुंबई शारीरिक शिक्षण मंडळ

भारतीय क्रीडा मंदिर, नायगांव वडाळा क्रॉस रोड, मुंबई-४०० ०३१.

## सन २०१६-२०१७ या वर्षातील कार्याचा अहवाल
## [वर्ष ८२ वे]

**[प्रास्ताविक:-** अमृतमहोत्सवी वर्षाकडून शताब्दी वर्षाकडे वाटचाल करणारी आणि एकेकाळी बृहन्मुंबईतील बहुतेक सर्वच देशी खेळांचे तसेच सुमारे ८००-८५० हुतुतु/कबड्डी क्लबज्, शाळा, महाविद्यालये, क्रीडा संस्था आणि व्यायाम संस्थांचे नियमन करणारी 'मुंबई शारीरिक शिक्षण मंडळ' ही संस्था 'एक खेळ-एक संस्था' [वन गेम वन फेडरेशन] या तत्वामुळे या संस्था आणि देशी खेळ जरी बाजूला झाले तरी आजही आपल्या ध्येयान्वेषी कार्यामुळे शारीरिक शिक्षण व क्रीडा क्षेत्रात ताठ मानेने उभी आहे. दि.२९ जून,१९३५ साली म्हणजे ब्रिटीश राजवटीत "बलम् राष्टस्य वर्धनम्" या उदात्त राष्ट्रीय ध्येयाने प्रेरित होऊन स्थापन झालेल्या संस्थेने आजवर अनेकविध उपक्रम राबवून शारीरिक शिक्षण व क्रीडाक्षेत्रासाठी वैशिष्ट्यपूर्ण असे योगदान दिलेले आहे. गेल्या ८१ वर्षात संस्थेने असंख्य खेळाडू, कार्यकर्ते, मार्गदर्शक, तज्ञ आणि शिक्षक निर्माण केलेले आहेत. आजही मंडळाचे 'क्रीडाविश्व' हे त्रैमासिक, शारीरिक शिक्षण महाविद्यालय, क्रीडाप्रशिक्षण केंद्र, योग अभ्यास केंद्र, फिटनेस सेंटर आणि मंडळाकडून प्रतिवर्षी घेतल्या जाणा-या आणि पुरस्कृत केल्या जाणा-या विविध खेळांच्या भव्य स्पर्धा तसेच आयोजित करण्यात येणारे विविध सामाजिक उपक्रम मंडळाच्या वैशिष्ट्यपूर्ण कार्याची साक्ष पटवून देत आहेत.]

मुंबई शारीरिक शिक्षण मंडळाचा सन २०१६-२०१७ या वर्षातील कार्याचा अहवाल मंडळाच्या सभासदांना सादर करतांना आम्हाला आनंद होत आहे. वर्षभरातील कार्याचा संक्षिप्त अहवाल पुढीलप्रमाणे-

### १. संस्थेच्या शारीरिक शिक्षण महाविद्यालयाचे कार्य

#### १.१ शैक्षणिक वर्षाचा प्रारंभ

मुंबई शारीरिक शिक्षण मंडळाच्या शारीरिक शिक्षण महाविद्यालयाच्या बी.पी. एड. या दोन वर्षे कालावधीच्या दुस-या बॅचच्या अभ्यासक्रमाच्या ३८ व्या आणि एम.पी.एड. अभ्यासक्रमाच्या १९ व्या शैक्षणिक वर्षाची सुरूवात दि.२० सप्टेंबर,२०१६ रोजी झाली. त्यादिवशी आयोजित करण्यात आलेला उद्घाटन सोहळा संस्थेचे अध्यक्ष, मा.श्री.संजय बाबुराव शेटे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला. बी.पी.एड. अभ्यासक्रमास ७२ पदवीधरांना [३९ पूरूष व ३३ महिला] तर एम.पी.एड्. [प्रथम वर्ष] अभ्यासक्रमास २५ विद्यार्थ्यांना [१३ पूरूष व १२ महिला] प्रवेश दिला गेला. सदर प्रवेश प्रक्रिया उच्च शिक्षण संचालनालयाद्वारे पार पाडण्यात आली. बीपीएड व एमपीएड अभ्यासक्रमाच्या द्वितीय वर्षाची सुरूवात दि.११ जुलै २०१६ रोजी करण्यात आली.

#### १.२ कुलपध्दती

अधिक प्रभावी व परिणामकारकरित्या प्रशिक्षण देण्यासाठी आणि व्यवस्थापनदृष्टया सोयिस्कर व्हावे म्हणून ऑगष्ट महिन्यात बी.पी.एड. [प्रथम वर्ष] अभ्यासक्रमाच्या सर्व पुरूष प्रशिक्षणार्थ्यांचे आनंद, प्रताप, संग्राम अशा तीन तर महिलांचे प्रगती व शक्ती अशा दोन समतुल्य कुलांमध्ये [गटांमध्ये] त्यांचे शैक्षणिक, क्रीडा आणि कला यातील संपादन लक्षांत घेऊन विभाजन करण्यात आले.

#### १.३ देशभक्तीपर गायन प्रशिक्षण व आंतरकुल स्पर्धा

दि.१२ व १३ ऑगष्ट, २०१६ रोजी प्रसिध्द गायक श्री.सोमनाथ परब यांचे मार्गदर्शनाखाली समुहगीत गायनाचे प्रशिक्षण शिबिर आयोजित करण्यात आले. तसेच दि.१५ ऑगष्ट, २०१६ रोजी मंडळाचे अध्यक्ष श्री.संजय शेटे व शारीरिक शिक्षण महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.गो.वि.पारगांवकर यांच्या उपस्थितीत ध्वजवंदन कार्यक्रम पार पडला. त्यानंतर देशभक्तीपर समुहगीतांच्या आंतरकुल स्पर्धा पार पडल्या. त्यात सर्व विद्यार्थ्यांनी उत्स्फुर्तपणे सहभागी होऊन विविध वेश परिधान करून प्रभावीरित्या देशभक्तीपर समुहगीते सादर केली. त्याच दिवशी सर्व विद्यार्थ्यांनी 'प्रभादेवी' येथील मिनी थिएटरमध्ये महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य संचालनालयाने आयोजित केलेल्या समुहगान कार्यक्रमात भाग घेतला.

#### १.४ पायी पर्यटन/गिर्यारोहण /सहल

अभ्यासेतर कार्यक्रमांच्या आयोजन व प्रशिक्षणाचा एक भाग म्हणून दि.१५ सप्टेंबर,२०१६ रोजी लोणावळा राजमाची कर्जत असा पायीपर्यटन व गिर्यारोहणाचा कार्यक्रम घेण्यात आला. त्यावेळी बीपीएड अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षाच्या सर्व प्रशिक्षणार्थ्यांनी निसर्गाचा आनंद मनसोक्त लुटून नेरळ ते माथेरान व परत हे अंतर पायी चालून आपल्या शारीरिक सक्षमतेची चुणुक पटवून दिली. तसेच त्याचदिवशी बीपीएड द्वितीय वर्ष अभ्यासक्रमाच्या

विद्यार्थ्यांनी 'एलिफंटा लेणी' येथे सहल आयोजित करून सहल आयोजनाचे प्रशिक्षण व अनुभव घेतला.

## १.५ शिक्षक दिन [स्वयंशासन व वक्तृत्व स्पर्धा]

दि.५ सप्टेंबर,२०१६ रोजी शिक्षक दिनानिमित्त बीपीएड [प्रथम वर्ष] अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांसाठी स्वयंशासन, वक्तृत्व स्पर्धा बीपीएड [द्वितीय वर्ष] वर्ष अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांसाठी विद्यार्थी-प्रशासन [स्वयंशासन] कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. तसेच 'शारीरिक शिक्षणाचे राष्ट्रीय शिक्षणातील योगदान' या विषयावर वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. त्याचदिवशी डॉ.मन्मथ घरोटे, लोणावळा योग संस्था यांचे अध्यक्षतेखाली पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांसाठी **'Awakening of Wisdom through Qualities'** या विषयावर वक्तृत्व स्पर्धा आयोजित केली. त्यात भाग घेणा-या विद्यार्थ्यामधून खालील विजेत्यांना सन्मानित करण्यात आले--

**प्रथम क्रमांक**- हेमंत शर्मा, **द्वितीय क्रमांक**-प्रियांका, **तृतीय क्रमांक**-लिबिन वालियाविला, अश्विनी साळकर

## १.६ राष्ट्रीय क्रीडा दिनाचे आयोजन

दि.२९ ऑगष्ट, २०१६ रोजी राष्ट्रीय क्रीडा दिनी **'शारीरिक शिक्षण व क्रीडेचे महत्व'** या विषयावर वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. त्यावेळी खालील विजेत्या स्पर्धेकांना बक्षिसे देण्यात आली.

प्रथम क्रमांक - श्रीमती अश्विनी अदक<br>
द्वितीय क्रमांक - श्रीमती श्रध्दा लाड<br>
तृतीय क्रमांक - श्री.अभिषेक शर्मा

## १.७ भारतीय संविधान दिनाचे आयोजन

दि.२६ नोव्हेंबर,२०१६ रोजी संविधान दिनानिमित्त महाविद्यालयात **'संविधान प्रास्ताविक वाचन आणि भित्तीपत्रक प्रदर्शन'** या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

## १.८ आंतर-महाविद्यालयीन क्रीडा स्पर्धाचे आयोजन [व्हॉलीबॉल आणि कुस्ती]

महाविद्यालयाच्या सर्व शिक्षक-विद्यार्थ्यांनी दि.१८ ते २० ऑक्टोबर,२०१६ या कालावधीत मुंबई विद्यापीठाच्या व्हॉलीबॉल आणि कुस्ती या खेळाच्या आंतर-महाविद्यालयीन स्पर्धांचे महाविद्यालयाच्यावतीने यशस्वीरित्या आयोजन केले.

## १.९ आंतर-शालेय लेझीम स्पर्धा:-

प्रतिवर्षीप्रमाणे मंडळाच्यावतीने कै. दत्ताराम लाड फिरत्या चषकाच्या आंतर शालेय लेझीम स्पर्धा १६ डिसेंबर,२०१६ रोजी झाल्या. त्यात ११ शाळांच्या सुमारे १००० मुला-मुलींनी भाग घेतला. पहिल्या तीन विजयी शाळांना संस्थेतर्फे रोख बक्षिसे व स्मृतिचिन्हे देण्यात आली. शिवाय स्पर्धेत सहभागी झालेल्या सर्व शाळांना सहभाग प्रमाणपत्रे देण्यात आली. स्पर्धेचे उद्घाटनप्रसंगी प्रमुख पाहुणे छत्रपती शिवाजी विद्यालयाच्या [धारावी] मुख्याध्यापिका मा.सौ.विना दोलवलकर, मुंबई शारीरिक शिक्षण मंडळाचे अध्यक्ष संजय बाबूराव शेटे, राष्ट्रीय मिल मजदूर संघाचे सरचिटणीस गांविंदराव मोहिते, शिवछत्रपती पुरस्कार विजेते लिलाधर चव्हाण, शारीरिक शिक्षण महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.गो.वि.पारगांवकर, मुंबई शारीरिक शिक्षण मंडळाचे सदस्य प्रभाकर पानसरे, दिपक कांदळगांवकर, विजय कांबळे, श्रीमती नलिनी फडणीस, शारीरिक शिक्षण महाविद्यालयाचे सर्व शिक्षक, स्पर्धाप्रमुख डॉ.रोहिणी चंद्रकांत कवडे आदि मंडळी उपस्थित होती.

## १.१० आंतर-शालेय हिंद करंडक स्पर्धा [कबड्डी, खो-खो, लंगडी]

प्रतिवर्षाप्रमाणे यावर्षीदिखील संस्थेच्यावतीने महाविद्यालयाने घेतलेल्या आंतरशालेय हिंदकरंडक स्पर्धा महाविद्यालयाच्या सर्व शिक्षक व विद्यार्थ्यांनी आयोजित करून यशस्वीरित्या पार पाडल्या. दि. १० ते १३ जानेवारी, २०१७ या कालावधीत घेतल्या गेलेल्या कबड्डी, खो-खो व लंगडी या खेळांच्या सदर स्पर्धेत विविध शाळांच्या १२४ संघाच्या १४८८ मुला-मुलींनी [८५२ मुले व ६३६ मुली]भाग घेतला होता. सदर स्पर्धेत बीपीएड अभ्यासक्रमाच्या [द्वितीय वर्ष] विद्यार्थ्यांना स्पर्धा आयोजनाचा प्रत्यक्ष अनुभव देण्यात आला.

## १.११ ॲथलेटिक्स प्रशिक्षण व मैदानी स्पर्धा

बीपीएड अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांकरीता दि.२० ते २५ मार्च, २०१७ या कालावधीत विद्यापीठ क्रीडा संकुल, मरीन लाईन्स येथील आंतरराष्ट्रीय दर्जाच्या सिंथेटीक धावन मार्गावर ॲथलेटीक्सचे प्रशिक्षण तसेच मैदानी स्पर्धा घेण्यात आल्या.

**१.१२ मराठी भाषा गौरव दिन** - दि. १७ फेब्रुवारी २०१७ रोजी महाविद्यालयात मराठी भाषा गौरव दिन साजरा करण्यात आला. त्यावेळी विद्यार्थ्यांनी काव्य वाचन, कविता वाचन केले तसेच **'मराठी भाषा विकास'** यावर व्याख्याने झाली.

**१.१३ मुल्यवर्धित अभ्यासक्रमाचे आयोजन–**

अहवालसाली बीपीएड द्वितीय वर्ष अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांसाठी त्यांच्या गुणवत्तेत वाढ व्हावी यासाठी Certificate Course In Personal Fitness Training(CCPFT) आणि Certificate Course In Fitness Centre Management (CCFCM) हे अल्पकालिन मुल्यवर्धित अभ्यासक्रम राबविण्यात आले त्यात बीपीएड द्वितीय वर्षाच्या सर्व विद्यार्थ्यांनी सहभागी होऊन सदर दोन्ही अभ्यासक्रम यशस्वीरित्या पूर्ण केले तसेच अहवालसाली बीपीएड द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांकरीता कबड्डी, खो-खो, लंगडी या खेळांच्या पंच परीक्षांचे (Value added programme) आयोजन करण्यात आले.

**१.१४ पदवी प्रमाणपत्र वितरण समारंभ–**

दि.११ मार्च, २०१७ रोजी मुंबई विद्यापीठाच्या पदवी प्रमाणपत्र वितरण समारंभाचे दिमाखदार आयोजन करण्यात आले. त्यावेळी संस्थेचे अध्यक्ष श्री.संजय बाबूराव शेटे, डॉ.गो. वि पारगांवकर हे मान्यवर उपस्थित होते.

**१.१५ योग दिवस–**

दि.२१ जून, २०१६ रोजी 'योग दिवस' निमित्त आयोजित कार्यक्रमात सर्व शिक्षक सहभागी झाले त्यावेळी **योग प्रात्यक्षिक व ध्यान** यावर श्री.दिलिप पोदार यांचे व्याख्यान झाले.

**१.१६ कार्यशाळा–**

महाविद्यालय आणि असोसिएशन ऑफ नॉन गव्हर्नमेंट कॉलेजेस, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने दि.२३ जून २०१६ रोजी **'महाराष्ट्र पब्लिक युनिर्व्हसिटीज बील २०१६'** या विषयावर एक दिवसाची कार्यशाळा आयोजित वकरण्यात आली. त्यावेळी माजी मुख्यमंत्री मा. अशोकरावजी चव्हाण, आमदार मा.शरद पीसे, डॉ.राजू वाघमारे, मा.आ.कपिल पाटील शिक्षक भरती, मा.प्रकाश सोनोने, प्रि.तायवडे नागपूर, डॉ.तुकाराम शिवारे इत्यादी मान्यवर उपस्थित होते. सदर कार्यशाळेत उच्च शिक्षण क्षेत्रातील सुमारे १०० व्यक्तींनी सहभाग घेतला.

**१.१७ कबड्डी दिनाचे आयोजन [परिसंवाद] –**

दि.१५ जुलै, २०१६ रोजी कबड्डी दिनानिमित्त **''कबड्डीची ध्येयान्वेषी वाटचाल''** या विषयावर परिसंवादाचे आयोजन करण्यात आले. त्यात बीपीएड द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांनी भाग घेतला. परिसंवादाच्या बक्षिससमारंभप्रसंगी ज्येष्ठ कबड्डीपटू श्री.सदानंद शेटे तसेच आयडियल स्पोर्टस अकॅडेमी या संस्थेचे अध्यक्ष मा.श्री.लिलाधर चव्हाण उपस्थित होते.

**१.१८ चर्चा सत्राचे आयोजन–**

दि.२ ऑगष्ट, २०१६ रोजी महाविद्यालयात **'ऑलिम्पिक्स– सत्य व मिथ्य'** [Olympics- Myths & Reality] या विषयावर विद्यार्थ्यांसाठी चर्चासत्र आयोजित करण्यात आले त्यावेळी प्राध्यापक डॉ.जयसिंग होटकर व प्राचार्य डॉ.पारगांवकर यांनी व्याख्यान दिले.

**१.१९ माजी विद्यार्थी संमेलन व आनंद सोहळा –**

महाविद्यालयास सन २०१६ ते २०२१ या कालावधीकरीता नॅकची 'अ' श्रेणी मिळाल्याने सर्व माजी विद्यार्थ्यांचे दि.१३ ऑगष्ट २०१६ रोजी संमेलन व आनंद सोहळा आयोजित करण्यात आला. त्यावेळी संस्थेचे अध्यक्ष, मा.श्री.संजय शेटे, मा.श्री.लिलाधर चव्हाण व बहुसंख्य माजी विद्यार्थी मोठया संख्येने आवर्जुन उपस्थित होते.

**१.२० बालवीर व वीरबाला प्रशिक्षण शिबिर–**

बीपीएड [द्वितीय वर्ष] अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांसाठी दि.२० फेब्रुवारी ते २५ फेब्रुवारी, २०१७ या कालावधीत पनवेल नजिक 'शांतीवन' येथील निसर्गरम्य परिसरात ६ दिवसांचे स्काऊट व गाईड प्रशिक्षण शिबिर आयोजित करण्यात आले. सदर शिबिराला संस्थेचे सचिव श्री.दिपक शेटे, महाविद्यालयाचे संचालक डॉ.गो.वि. पारगांवकर, डॉ.संध्या जिंतुरकर पुणे, इ. मान्यवरांनी भेटी देऊन विद्यार्थ्यांनी केलेल्या उपक्रमांचे कौतुक केले.

**१.२१ वाचन प्रेरणा दिनाचे आयोजन–**

दि.१५ ऑक्टोंबर २०१६ या दिवशी भारताचे माजी राष्ट्रपती डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या जयंती निमित्त महाविद्यालयात **'वाचन प्रेरणा दिन'** साजरा करण्यात आला. त्यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.गो.वि. पारगांवकर यांचे अध्यक्षतेखाली विद्यार्थ्यांच्या **वक्तृत्व स्पर्धा, अग्रलेख वाचन, काव्यवाचन, कथावाचन** अशा विविध स्पर्धा घेण्यात आल्या. त्यामध्ये बीपीएड अभ्यासक्रमाच्या सर्व विद्यार्थ्यांनी सक्रीय सहभाग घेतला. कार्यक्रमाचे शेवटी वक्तृत्व स्पर्धा व काव्यवाचन स्पर्धेच्या खालील विजेत्यांना पुस्तके भेट देऊन गौरविण्यात आले.

वक्तृत्व स्पर्धा– प्रथम क्रमांक –श्रीमती दिपाली तोरकडी, शक्ती हाऊस
द्वितीय क्रमांक –श्री.लिबिन वालियाविला, संग्राम कुल
तृतीय क्रमांक –श्री.जयराम शिंदे, विजय कुल

काव्य वाचन स्पर्धा– प्रथम क्रमांक –श्री.शाम सरोज, प्रताप कुल
द्वितीय क्रमांक –श्रीमती स्नेहल खुळे, शक्ती कुल
तृतीय क्रमांक विभागून – श्रीमती अनिता सवर, प्रगती कुल व
श्री.अनिकेत जैतापकर, आनंद कुल

सदर दिवशी महाविद्यालयीन परिसरात **'डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम वाचन कट्टा'** याचे उद्‌घाटन करण्यात आले. या कट्टयावर सर्व विद्यार्थ्यांनी काही वेळ बसून वाचन केले.

**१.२२ व्याख्यान [कुष्ठरोग] –**

दि.१० ऑक्टोंबर,२०१६ रोजी ॲक्वर्थ महापालिका कुष्ठरोग रूग्णालय, वडाळा यांच्या सौजन्याने आयोजित केलेल्या कार्यक्रमप्रसंगी **कुष्ठरोग–आरोग्य शिक्षण** या विषयावर मा.श्री.आनंद सूर्वे, मा.श्री.एम.व्ही. पाटील व श्री.एस एम गुप्ता इ. तज्ञांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

**१.२३ राष्ट्रीय क्रीडा परिषदेत विद्यार्थी आणि शिक्षकांचा सक्रिय सहभाग –**

दि.१८ मार्च, ते १९ मार्च,२०१७ या कालावधीत **'ॲडव्हान्सेस इन अप्लाईड स्पोर्टस् सायकॉलॉजी'** या विषयावर 'डी.ए.व्ही. कॉलेज, चंदीगड व अखिल भारतीय क्रीडा मानसशास्त्र संघटनेद्वारा आयोजित केलेल्या राष्ट्रीय चर्चासत्र व कार्यशाळेत महाविद्यालयाच्या पदव्युत्तर व पीएचडी अभ्यासक्रमाच्या ४२ विद्यार्थ्यांनी तसेच प्रभारी प्राचार्य व ४ शिक्षकांनी सहभागी होऊन पुढीलप्रमाणे शोध निबंध सादर केले.

| Sr. No. | Name of the Presenter | Title of the Paper |
|---|---|---|
| 1 | /Rachel Fernandes,<br>Royal Dias,<br>Kalpesh Patel | Effect of Arobic Training Programme on Psychological Parameters of School Girls aged 12-14 years. |
| 2 | /Ambrita More.<br>/Pradnya Sakpal,<br>Abhishek Yadav | Effect of Traditional Exercise Training Programme on Health Related Physical Fitness of Junior College Boys. |
| 3 | /Swapnali Tambe,<br>Kiran Thorat,<br>/Shubhangi Phadtare | A Comparative Study of Competitive Sports Anxiety among Football and Volleyball Players. |
| 4 | Anwarzumma Khan.<br>Fayas Jamadar,<br>/Shruti Sawnat,<br>/Divya Verma | A Comparative Study of Anxiety and Stress Level of Karate and Taekwondo Players of Mumbai City District aged 12 to 14 years. |
| 5 | Manoj Thange,<br>Omkar Chavan,<br>Gayasuddin Balwar | Effect of Circuit Training on Selected Motor Fitness Componenets and Performance of School Level Kho-Kho Players. |
| 6 | Ankesh Yeram,<br>Devendra Nimunkar,<br>/Pragati Ramteke | A Comparative Study of Peronality Traits between Karate and Volleyball Players of Mumbai City |
| 7 | Vishal Mhapankar,<br>Harish Waidande,<br>/Shwetali Kode | Effect of Progressive Muscular Stretching And Relaxation Programme on the Skill Performance of Volleyball Players. |

| | | |
|---|---|---|
| 8 | /Vimala Tiwari,<br>Dr.Kishore Maru,<br>/Priyanka Jadhav | Effect of Yogic Practices on Health Related Physical Fitness of Senior Wing Girls of NCC |
| 9 | /Meenakshi Agarwal,<br>Januarita D'souza,<br>Dr.G.V. Pargaonkar | A Comparative Study of Job Satisfaction and problem faced by Secondary Physical Educators and coaches recuited by school management and outsourced agencies. |
| 10 | /Nikita Salvi,<br>Dr.Neetu Joshi,<br>/Bhagyashree Bhilare | Effect of Aerobic Training programme on Dimensional Personality of Taekwondo players. |
| 11 | /Meenakshi Agarwal,<br>Januarita D'souza,<br>Dr.R.R. Dhakne | Efficacy of Football Training programme on Health Related Physical fitness of School Boys aged 12-14 years |
| 12 | /Dipali Patil,<br>Dr.Kishore Maru,<br>/Trupti Save | Effect of Judo Training Programme on Stress of School Boys |
| 13 | Nishant Kolhe,<br>Snehal Khobarekar | Efficacy of Judo Training Programme for the Promotion of Health Related Physical Fitness of School Boys. |
| 14 | /Pratiksha Kshirsagar,<br>Dr.Kishore Maru | Effect of Yogic Practices on General Well being of Senior Wing Girls of NCC |
| 15 | /Priyanka Malkar<br>Dr.Neetu Joshi | Efficacy of Judo Training Programme for the Promotion of Psychological Well being of School Girls Aged 12-14 years. |
| 16 | Manoj Verma<br>Dr.G.K.Dhokrat | Effect of Traditional Exercises Training Programme on Mental Health of Junior college Boys. |
| 17 | /Anagha A.Kulkarni<br>Manisha Sakharkar<br>Dr.G.V. Pargaonkar | Effect of Integrated Physical Activity Programme on the basis of Personal Values of Children's Home Girls aged 13 to 16 years of Greater Mumbai. |
| 18 | /Sushama Chougule,<br>Rajesh Balmiki,<br>/Shital Jadhav | Effect of Specific Training Programme for the promotion of Health Related Physical Fitness of Intellectually Disabled Children. |
| 19 | Mandar Gawade,<br>Sandeep Kedar | Effect of Aerobic Training Programme on Motor Fitness Componenets of Taekwondo Players aged 12-14 years. |

महाविद्यालयाचे विद्यार्थी सर्वश्री मनोज ठाणगे, ओंकार चव्हाण व गयासुद्दीन बलवार यांनी **"Effect of Circuit Training on Selected Motor Fitness Componenets and Performance of School Level Kho-Kho Players."** या विषयावर सादर केलेल्या पोस्टरला प्रथम क्रमांकाचे तर कु.अक्षता मोरे, कु.प्रज्ञा सकपाळ व अभिषेक यादव यांनी **"Effect of Traditional Exercise Training Programme on Health Related Physical Fitness of Junior College Boys."** या विषयावरील पोस्टरला द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक मिळाले. महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ.राजेंद्र ढाकणे तसेच डॉ.नितु जोशी, डॉ.किशोर मारू यांनी सदर परिषदेत तज्ञ (Resource Person) म्हणून काम केले.

## १.२४ विस्तार कार्य

अहवालसाली महाविद्यालयाच्या सर्व शिक्षक विद्यार्थ्यांनी खालील विविध उपक्रमात भाग घेवून महत्वपूर्ण असे विस्तार कार्य केले--

१. **अपंग खेळाडूंसाठी स्पर्धा आयोजन –** साधना विद्यालय, दादर या शाळेने अंध, मतिमंद, कर्णबधिर व अस्थिव्यंग असलेल्या विद्यार्थ्यांसाठी आयोजित केलेल्या मैदानी स्पर्धांच्या आयोजनात महाविद्यालयाच्या १५ विद्यार्थ्यांनी पंच म्हणून कामे करून स्पर्धा यशस्वीरित्या पार पाडल्या.

२. **विविध संस्था / शाळांच्या स्पर्धा आयोजनाचा अनुभव:–** महाविद्यालयाच्या विद्यार्थी आणि शिक्षकांनी खालील विविध शाळा/संस्थांनी आयोजित केलेल्या खालील स्पर्धांमध्ये पंच व अधिका-याची यशस्वीरित्या कामे केली–

- सुविद्यालय हायस्कूल, [बोरीवली] आयोजित सूर्यनमस्कार स्पर्धा– दि.१ ऑगष्ट,२०१६.
- मुंबई स्कूल्स स्पोर्टस असोसिएशनच्या आंतरकुल जिम्नॅस्टिक्स स्पर्धा– दि.२२, २६,२७ नोव्हेंबर आणि १० व ११ डिसेंबर २०१६.
- मुंबई शहर जिम्नॅस्टिक्स असोसिएशनद्वारा आयोजित टॅलेंट डिस्प्ले स्पर्धा– दि.४ मार्च,२०१७.

- मुंबई विद्यापीठ आयोजित आंतर महाविद्यालयीन मैदानी क्रीडा स्पर्धा- दि.११, १२ व १३ नोव्हेंबर,२०१६.
- ठाणे जिल्हा परिषद, शिक्षण विभाग आयोजित आंतरशालेय क्रीडा स्पर्धा- दि.२ फेब्रुवारी २०१७.
- श्रीमती कमलादेवी मित्तल कॉलेज,[मालाड] आयोजित वार्षिक क्रीडा स्पर्धा- दि.५ जानेवारी, २०१७.
- जय वकील, स्कूल फॉर चिल्ड्रेन इन नीड ऑफ स्पेशल केअर, शिवडी, मुंबई-३३ द्वारा आयोजित मतिमंद/अपंग मुलांच्या वार्षिक क्रीडा स्पर्धा दि.३ फेब्रुवारी,२०१७.

**१.२५ क्रीडा पत्रकारीता राज्यस्तरीय कार्यशाळा-**

फेब्रुवारी व मार्च २०१७ या महिन्यात **'क्रीडापत्रकारीता'** या विषयावर चार दिवसांची दि.१८ व २५ फेब्रुवारी आणि ४ व ११ मार्च २०१७ या कालावधीत कार्यशाळा आयोजित करण्यात आली. त्यामध्ये महाविद्यालयाचे एमपीएड व पीएचडी अभ्यासक्रमाच्या तसेच राज्यातील इतर ठिकाणाहून आलेल्या सुमारे ७० व्यक्तींनी सक्रिय सहभाग दिला. सदर कार्यशाळेत मा.श्री.प्रशांत किणी [लोकसत्ता दैनिक, विशेष क्रीडा प्रतिनिधी], मा.श्री.शैलेश नागवेकर [सकाळ दैनिक क्रीडा वार्ताहर], मा.श्री.महेश विचारे [महाराष्ट्र टाईम्स दैनिक क्रीडा वार्ताहर] व श्रीमती ऋतुजा लुकतुके [जय महाराष्ट्र दुरदर्शन वाहिनी] या तज्ञांनी क्रीडा पत्रकारितेसंबंधी डेटालाईन, बायलाईन, क्रेडीटलाईन व मुलाखत, बातमी लेखन, सामना अवलोकन, तंत्रज्ञान व सोसियल नेटवर्किंगचा उपयोग, ॲंकरिंग, वृत्तवाहिनी पत्रकारीता इत्यादी अंगांची प्रात्यक्षिक कार्य व व्याख्यान देऊन माहिती दिली.

**१.२६ मराठी क्रीडा विश्वकोश निर्मिती चर्चा व कार्यशाळा -**

मराठी भाषेत क्रीडा विषयक विश्वकोश निर्मितीसाठी महाराष्ट राज्य मराठी क्रीडा विश्वकोश निर्मिती मंडळाचे अध्यक्ष श्री.दिलिप करंबेळकर यांचे अध्यक्षतेखाली राज्यातील निवडक लेखन तज्ञांची दि.२४ मार्च २०१७ रोजी सभा घेण्यात आली व सभेतील चर्चेनुसार **क्रीडा विश्वकोश नोंद लेखन** यावर महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळाच्यावतीने दि.१२ एप्रिल २०१७ रोजी कार्यशाळा घेण्यात आली. त्यामध्ये राज्याच्या विविध भागातील २४ तज्ञांनी भाग घेतला. प्रमुख तज्ञांमध्ये श्री.हेमंत श्रीधर जोगदेव[पुणे], डॉ. मकरंद जोशी[औरंगाबाद], सौ.हेमलता पाटील [कोल्हापुर], डॉ.संध्या जिंतुरकर [पुणे], डॉ.उदय मांजरे [अमरावती], डॉ.गो.वि.पारगांवकर [मुंबई] तसेच क्रीडा प्रसिध्दी माध्यमातील श्री.प्रशांत किणी, श्री.महेश विचारे, श्री.माधव चौडे, श्री.भगवान परब इ. मान्यवरांचा अंतर्भाव होता.

**१.२७ व्याख्यान व कार्यशाळा -**

दि.८ एप्रिल,२०१७ रोजी महाविद्यालयात 'प्रत्याहार' या विषयावर डॉ.राजेंद्र जोशी यांचे व्याख्यान व कार्यशाळा आयोजित केली गेली.

**१.२८ शारीरिक शिक्षण संशोधन केंद्राचे कार्य**

महाविद्यालयाने पुढाकार घेऊन मुंबई विद्यापीठाच्या मान्यतेने सर्वप्रथम १९९६ साली सुरू केलेल्या शारीरिक शिक्षण व क्रीडा संशोधन केंद्रातून आजपर्यंत एकूण ३५ जणांनी विद्यावाचस्पती [पी.एच.डी.] पदवी प्राप्त केली आहे. सद्या ३० विद्यार्थी पी.एच.डी. पदवीकरीता डॉ. गो.वि. पारगांवकर, डॉ.घ.का. ढोकरट, डॉ. रा.रं. ढाकणे व डॉ. कै.क. आसई या चार मार्गदर्शकांच्या मार्गदर्शनाखाली विविध विषयावर संशोधनाचे काम करीत आहेत. अहवालसाली खालील ९ संशोधकांनी मुंबई विद्यापीठाची पी.एच.डी. ही पदवी प्राप्त केली-

| अ.क्र. | संशोधक | मार्गदर्शक | संशोधन कार्य |
|---|---|---|---|
| १ | डॉ.जे.एम.होटकर | डॉ.गो.वि. पारगांवकर | Effect of Selected Yogic Programme on Kinesthetic Perceptual Ability of Senior Citizen of Jui Nagar Senior Forum. |
| २ | डॉ.महेंद्र सावंत | डॉ.गो.वि. पारगांवकर | Efficacy of Yogic Practices for the Promotion of Academic Achievement, Mental Health & Health Related Physical Fitness of Adolescent School Students. |
| ३ | डॉ.ओमप्रकाश जोशी | डॉ.गो.वि. पारगांवकर | Yoga and Exercise Training Programme for Reversal of Declined Status in HRPF, Mental Health and Emotional Intelligence of School Students. |
| ४ | डॉ.भारती ढोकरट | डॉ.गो.वि. पारगांवकर | Effect of Yoga on Postural Deformities Health Related Physical Fitness and Mental Health of School Children. |

| | | | |
|---|---|---|---|
| ५ | डॉ.आर.एन.शेळके | डॉ.गो.वि. पारगांवकर | Survey of HRPF and Performance Related Fitness of the Students Dwelling in Non-Slum and Slum Areas in Greater Mumbai. |
| ६ | डॉ.ॲवर्टयानो बेराटो | डॉ.राजेंद्र ढाकणे | Study of Utility of Training on Sand and Grass Surfaces for the Promotion of Psychomotor Ability and Performance of Footballs of Goa. |
| ७ | डॉ.संदीप शिंदे | डॉ.राजेंद्र ढाकणे | Construction of Test battery for the Selection of Inter Collegiate Volleyball Players of University of Mumbai. |
| ८ | डॉ.सचिन शिंदे, | डॉ.घनश्याम ढोकरट | Study on Existing Method and Development of Specific Method as Remedial Measure for Over Weight and Obese Urban Adults. |
| ९ | डॉ.किरण आहेर | डॉ.घनश्याम ढोकरट | Normative Study of Health Related Physical Fitness Components for School Students of Ahmednagar District. |

## १.२९ अ. शिक्षक सहभाग व विशेष कार्य

वर्षभरात महाविद्यालयाचे प्राचार्य व शिक्षकवृंदाने खालील विविध चर्चासत्र, कार्यशाळा, परिषदांमध्ये भाग घेऊन शोधनिबंध सादर केले--

| Sr. No. | Name of the Teacher | Theme of the Seminar/Conference/Symposia (please specify whether it was a Seminar/Conference/Symposia as the case may be) | Name of the Organiser | Date & Place | Title of the Paper presented/ read |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Dr.G.V. Pargaonkar | Refresher Course in the Research Methodology | Department of Educaton & Extension Savitribai Phule Pune University | July 04-24, 2016 | Delivered lecture on writing & stating Research Problem & Pilot Study |
| | | National Level Conference on Transforming India | L.G. college of Commerece & Economics | January 20, 2017 | Resourece Person |
| 2 | Dr.G.K. Dhokrat | International Workshop on Recent Trends in Physical Education and Sports Industry-2016 | Indian Federation of Computer Science in Sports Under the Auspices of :Internation Association of Computer Science in Sports | June 26th & 27 2016 | Participated |
| | | Workshop on Understanding the New Maharashtra Public University Act,2016 | Jointly organized by MUCTA(Affiliated to ABRSM) and Ramanand Arya D.A.V. College, Mumbai | 22nd April,2017 | Participated |
| 3 | Dr. R.R. Dhakne | National Seminar-cum-Workshop on Advances in Applied Sports Psychology | D.A.V. College, Sector-10, Chandigarh & Sports Psychology Association of India (SPAI) | March 18-19, 2017 | Efficacy of Football Training Programme on HRPF of School Boys aged 12 to 14 years. |
| | | National Seminar on Research Methodology and Curriculum Development in Physical Education | Department of Physical Education , University of Mumbai | March 22-24, 2017 | Effect of Aerobic Training Programme on Motor Fitness and Psychological Variable of Taekwondo Players Aged 12-14 years. |
| | | Participated in the Refresher Course in the subject of Teachers Educator (Physical Education) | Department of Educaton & Extension Savitribai Phule Pune University | July 04-24, 2016 | Participated |
| | | State Level Workshop on Sports Journalism | B.P.C.A.'s College of Physical Education, Wadala, Mumbai-31. | Feb. 18 & 25 March 4 & 11, 2017 | Participated |
| 4 | Dr. J.M. Hotkar Asstt. Prof. | International Conference in Physical Education and Sports Science on Emerging Trends in Fitness and Sports Science | Department of Arts (Phy.Edn.) Manipal University Jaipur | Jan. 05-07, 2017 | Effect of Yoga in Developing Mobility Skills of Senior Urban Citizens. |
| 5 | Dr. N.O. Joshi Asstt. Prof. | Participated in the Refresher Course in the subject of Teachers Educator (Physical Education) | Department of Educaton & Extension Savitribai Phule Pune University | July 04-24, 2016 | Participated |
| | | International Congress on Sports Science and Yoga | LNIPE, Gwalior at Vigyan Bhavan, New Delhi | Feb.02-04, 2017 | Effect of Yoga and Aerobic Exercises on Health Related |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | Physical Fitness of Junior College Girls with Irregular Menstruation Cycle |
| | | International Congress on Sports Science and Yoga | LNIPE, Gwalior at Vigyan Bhavan, New Delhi | Feb.02-04, 2017 | Efficacy of Judo Training Programme for Promotion of Motor Fitness and Psychological Wellbeing of School Girls Aged 12-14 yrs. |
| | | International Congress on Sports Science and Yoga | LNIPE, Gwalior at Vigyan Bhavan, New Delhi | Feb.02-04, 2017 | Effect of Aerobic Training Programme on Motor Fitness and Psychological Variable of Taekwondo Players Aged 12-14 years. |
| | | National Seminar-cum-Workshop on Advances in Applied Sports Psychology | D.A.V. College, Sector-10, Chandigarh & Sports Psychology Association of India (SPAI) | March 18-19, 2017 | Effect of Aerobic Training Programme on Dimensional Personality of Taekwondo Players |
| | | National Seminar-cum-Workshop on Advances in Applied Sports Psychology | D.A.V. College, Sector-10, Chandigarh & Sports Psychology Association of India (SPAI) | March 18-19, 2017 | Efficacy of Judo Training Programme for Promotion of Psychological Wellbeing of School Girls Aged 12-14 years. |
| 6 | Smt. S.N. Chougule Asstt. Prof. | Seminar on Enhancing Quality in Higher Education : Challenges and Issues | Ramanand Arya D.A.V. College, Mumbai | April 09, 2016 | Effect of Yoga and Aerobics Training Programme for the Promotion of Health Related Physical Fitness of School Girls. |
| | | National Level Conference on Role of Psychology in Sports | Department of Physical Education and Psychology, Rajarshi Shahu Arts, Commerce & Science college Pathri, Dist-Aurangabad | January 28, 2017 | Power of Motivation & Coping with stress |
| | | State Level Workshop on Sports Journalism | B.P.C.A.'s College of Physical Education, Wadala, Mumbai-400031. | Feb. 18 & 25 March 4 & 11, 2017 | Participated |
| | | National Seminar-cum-workshop on 'Advances in Applied Sports Psychology'. | D.A.V. College, Sector-10, Chandigarh | March 18-19, 2017 | Participated |
| 7 | Dr. K.J. Maru Asstt. Prof. | RUSA Sponsored Orientation Programme | University Grants Commission Human Resource Development Centre | Jan.5 – Feb 2, 2017 | Participated |
| | | National Seminar-cum-Workshop on Advances in Applied Sports Psychology | D.A.V. College, Sector-10, Chandigarh & Sports Psychology Association of India (SPAI) | March 18-19, 2017 | Effect of Yogic Practices on Health Related Physical Fitness of Senior Wing Girls of NCC |
| | | National Seminar-cum-Workshop on Advances in Applied Sports Psychology | D.A.V. College, Sector-10, Chandigarh & Sports Psychology Association of India (SPAI) | March 18-19, 2017 | Effect of Judo Training Programme on Stress of School Boys Aged 12-14 years |
| | | National Seminar-cum-Workshop on Advances in Applied Sports Psychology | D.A.V. College, Sector-10, Chandigarh & Sports Psychology Association of India (SPAI) | March 18-19, 2017 | Effect of Judo Training Programme on Health Related Physical Fitness of School Boys Aged 12-14 years |
| | | National Seminar-cum-Workshop on Advances in Applied Sports Psychology | D.A.V. College, Sector-10, Chandigarh & Sports Psychology Association of India (SPAI) | March 18-19, 2017 | Effect of Yogic Practices on General Wellbeing of senior Wing Girls of NCC |
| 8 | Dr. R.C. Kawade Asstt. Prof. | Workshop on Teachers Training : Regional Workshop for International Day of Yoga | University of Mumbai, Kaivalyadhama & Ministry of Ayush | May 23-29, 2016 | Participated |
| | | International Conference in Physical Education and Sports Science on Emerging Trends in Fitness and Sports | Department of Arts (Phy.Edn.) Manipal University Jaipur | Jan. 05-07, 2017 | Effect of Yoga on Muscular Strength of Slum Area School girls |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | Science | | | |
| | | National Seminar on Research Methodology and Curriculum Development in Physical Education and workshop on Traditional Games of India | Department of Physical Education , University of Mumbai | March 22-24, 2017 | Effect of Aerobic Training Programme on Motor Fitness and Psychological Variable of Taekwondo Players Aged 12-14 years. |
| 9 | Dr. R.N. Shelke Asstt. Prof. | National Seminar on Changing Role of Teachers in Changing Times | IQAC, R.A. Podar College of Commerce & Economics, Matunga | Sept. 3, 2016 | Participated |
| | | International Conference in Physical Education and Sports Science on Emerging Trends in Fitness and Sports Science | Department of Arts (Phy.Edn.) Manipal University Jaipur | Jan. 05-07, 2017 | A Comparative Study of Body Fat Percentage of the Students Dwelling in non-slum and slum areas in Greater Mumbai |
| 10 | Dr. K.K. Asai Asstt. Prof. | National Seminar on Research Methodology and Curriculum Development in Physical Education and workshop on Traditional Games of India | Department of Physical Education , University of Mumbai | March 22-24, 2017 | Effect of Yogic Exercises for the Promotion of Physical Fitness & Badminton Skills of Junior College Girls |

## ब.शिक्षकांद्वारे प्रकाशित झालेले संशोधन लेख

| | |
|---|---|
| 1 | **Smt. S.N. Chougule**, " Effect of Yoga and Aerobics Training Programme for the Promotion of Health Related Physical Fitness of School Girls", **The Internal Quality Assurance Cell (I.Q.A.C.), ISSN 2231-5063** |
| 2 | **Dr. R.C. Kawade**, "Yogic Practices for Health Related Physical Fitness and Mental Health Abilities of Slum Areas School Girls", **Laxmi Book Publication. , ISBN No. 978-1-365-36394-8**, 2016 |
| 3 | **Dr. R.C. Kawade**, "Effect of Yoga on Muscular Strength of Slum Area Girls Students of Mumbai", **IRJPESAS. Publication : SSUS Allahabad , UPBIL 04010/2010**, March, 2017 |
| 4 | **Dr. R.N. Shelke**, "Emerging Trends in Fitness and Sports Sciences", **Twenty first Century Publications, ISBN:978-93-85449-31-4 Vol-I** |
| 5 | **Dr. K.K. Asai**, "Effect of Yogic Exercises for the Promotion of Physical Fitness and Badminton Skills of Junior College Girls", **LAP LAMBERT Academic Publication. , ISBN No. 978-3-659-93857-3** |

## क. शिक्षकांचे विशेष कार्य

- **Prin. Dr. G. V. Pargaonkar** worked as ***NAAC Peer Team Member Co-Ordinator and Visited Anand Chandra College Jalpaiguri, West Bengal*** during 7th–9th September, 2016.
- **Prin. Dr. G. V. Pargaonkar** worked as ***NAAC Peer Team Member Co-Ordinator and Visited Chandraketngarh sahidulla S. Mahavidyalaya, North Bengal during 5th 7th December 2016.**.
- **Prin. Dr. G. V. Pargaonkar**, worked as ***NAAC Peer Team Member Co-Ordinator and Visited Meenatai Physical Education College, Peramnalir, Tamilnadu*** during 27th–28th March, 2017.
- **Prin. Dr.G.V. Pargaonkar** ***Visited and*** **worked as acting member co-ordinator** ***for Mock drill activity of proposed NAAC Peer Team to LNIPE*** during 13th–15th February, 2017.
- **Dr. R.R. Dhakne,** worked as ***Chairperson of Board of Studies and member of Academic Council University of Mumbai.***
- **Dr. R.R. Dhakne**, worked as ***Local Inquiry Committee Member of Expert Committee***, University of Mumbai for Inspecting Kalyan B.Ed. College in the month of October, 2016
- **Dr. N.O. Joshi** worked as ***Paper Setter and Examiner*** in Physical Education University of Mumbai
- **Dr. N.O. Joshi** worked as ***Paper Setter and Examiner*** in Physical Education Bharati Vidya Peeth, Pune.
- **Dr. K.J. Maru** invited ***as Statistical Experts for Pre-Ph.D. presentation of Research Scholars*** on 30th July, 2016 at Gokhale Education Society's College of Education and Research Parel, Mumbai-12.
- **Dr. K.J. Maru** worked ***as Paper Setter and Examiner*** in Physical Education University of Mumbai.
- **Dr. K.J. Maru** worked ***in Organizational Setup of Wrestling Competition Mahapor Chashak***.
- **Dr. K.J. Maru** worked ***in Organizational Setup of State level Greco-Roman Wrestling Competition.***
- **Dr. K.J. Maru** worked ***as Faculty in Health and Fitness Management Course.***

## १.३० आंतर महाविद्यालयीन, विद्यापीठीय, राज्य आणि राष्ट्रीय स्पर्धेतील सहभाग

सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षात मुंबई शारीरिक शिक्षण मंडळाच्या शारीरिक शिक्षण महाविद्यालयाच्या खालील विद्यार्थी-विद्यार्थीनींनी आंतर-महाविद्यालयीन राज्य, राष्ट्रीय व आंतर-विद्यापीठीय स्तरावरील विविध क्रीडा स्पर्धेत भाग घेवून उल्लेखनीय कामगिरी करून दाखविली-

### अ.वैयक्तिक कामगिरी:-

**१. श्रीमती स्नेहल खुळे [तलवारबाजी, बी.पी.एड.-द्वितीय वर्ष]**

- जानेवारी,२०१७ मध्ये झालेल्या आंतर महाविद्यालयीन तलवार बाजी स्पर्धेत **प्रथम क्रमांक.**
- फेब्रुवारी,२०१७ मध्ये रोहतक, हरियाना येथे झालेल्या आंतर विद्यापीठ स्पर्धेत सहभाग.

**२. श्रीमती ऐश्वर्या शिंदे [तायक्वांडो, बी.पी.एड.- द्वितीय वर्ष]**

- मार्च, २०१७ मध्ये मुंबई विद्यापीठ, मरीन लाईन्स, मुंबई येथे झालेल्या आंतर महाविद्यायीन स्पर्धेत प्रथम क्रमांक.
- एप्रिल,२०१७ मध्ये चंदीगड येथे झालेल्या आंतर महाविद्यालयीन स्पर्धेत सहभाग.

**३. श्रीमती भाग्यश्री अग्रवाल [हॉकी, बी.पी.एड.- द्वितीय वर्ष]**

- मार्च, २०१७ मध्ये मुंबई विद्यापीठ, मरीन लाईन्स, मुंबई येथे झालेल्या आंतर महाविद्यायीन स्पर्धेत सांघिक सहावा क्रमांक.
- मार्च, २०१७ मध्ये झालेल्या आंतर विद्यापीठ हॉकी स्पर्धेत सहभाग.

**४. श्रीमती पुजा बंगेरा [योग, बी.पी.एड.- प्रथम वर्ष]**

- जानेवारी,२०१७ मध्ये भिवंडी येथे झालेल्या आंतर महाविद्यालयीन स्पर्धेत सांघिक चतुर्थ **क्रमांक**.
- अखिल भारतीय आंतर विद्यापीठ १६ ते १९ मार्च २०१७ रोजी कुरूक्षेत्र विद्यापीठ येथील स्पर्धेत सहभाग.

**५. श्रीमती छाया सरगर [तायक्वांडो, बी.पी.एड.- प्रथम वर्ष]**

- राष्ट्रीय जिनकी दो स्पर्धेत सुवर्णपदक.
- आंतरराष्ट्रीय स्पर्धेत सहभाग
- आंतरमहाविद्यालयीन तायक्वांडो स्पर्धेत प्रथम स्थान
- आंतरविद्यापीठ स्पर्धेत सहभाग

**६. श्रीमती समृध्दी पवार [कुस्ती, बी.पी.एड.- प्रथम वर्ष]**

- राज्यस्तरीय स्पर्धेत प्रथम स्थान
- आंतरमहाविद्यालयीन कुस्ती स्पर्धेत प्रथम स्थान
- आंतरविद्यापीठ स्पर्धेत सहभाग

**७. श्रीमती प्रियांका fparke.k esgsj [क्रिकेट, बी.पी.एड.- प्रथम वर्ष]**

- आंतरविद्यापीठ स्पर्धेत सहभाग

**८. श्रीमती पुजा चतुर्वेदी [तायक्वांडो, बी.पी.एड.- प्रथम वर्ष]**

- राज्यस्तरीय स्पर्धेत सुवर्ण पदक
- राष्ट्रीय स्पर्धेत सुवर्ण पदक
- आंतरराष्ट्रीय स्पर्धेत द्वितीय क्रमांक
- आंतरमहाविद्यालयीन हॅण्डबॉल स्पर्धेत सहभाग

**९. श्रीमती श्वेताली नर [खो-खो, बी.पी.एड.- प्रथम वर्ष]**

- राज्यस्तरीय स्पर्धेत सहभाग
- आंतरमहाविद्यालयीन स्पर्धेत सहभाग

**१०. श्रीमती दिपाली यशवंत बालखंडे [कुस्ती, बी.पी.एड.– प्रथम वर्ष]**

- राज्यस्तरीय स्पर्धेत सहभाग
- महाराष्ट्र कोकण केसरी स्पर्धेत तृतीय स्थान

**११. श्री.तन्मय सुरेश घाणेकर [जिम्नॅस्टिक्स, बी.पी.एड.– प्रथम वर्ष]**

- राज्यस्तरीय स्पर्धेत सुवर्ण व रौप्य पदक

**१२. श्रीमती दिव्या पडवी [क्रॉसकंट्री, बी.पी.एड.– प्रथम वर्ष]**

- आंतरमहाविद्यालयीन स्पर्धेत द्वितीय स्थान
- आंतरमहाविद्यालयीन हाफ मॅरेथॉन स्पर्धेत सहभाग
- १०,००० मीटर धावणे, तृतीय स्थान

**१३. श्री.वर्मा आनंदकुमार [क्रॉसकंट्री, बी.पी.एड.– प्रथम वर्ष]**

- आंतरमहाविद्यालयीन बॉक्सींग स्पर्धेत तृतीय स्थान

**१४. श्रीमती स्नेहा मौर्या [कुस्ती, बी.पी.एड.– प्रथम वर्ष]**

- आंतरमहाविद्यालयीन स्पर्धेत तृतीय स्थान
- राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धेत सहभाग

**१५. श्रीमती कांचन लोहकरे [तायक्वांडो, बी.पी.एड.– प्रथम वर्ष]**

- आंतरमहाविद्यालयीन स्पर्धेत तृतीय स्थान

**१६. श्रीमती रोहिणी पवार [कुस्ती, बी.पी.एड.– प्रथम वर्ष]**

- आंतरमहाविद्यालयीन स्पर्धेत द्वितीय स्थान

**१७. श्री. यादव अभिशेक [ज्युडो, एम.पी.एड.– प्रथम वर्ष]**

- आंतर महाविद्यायीन ज्युडो स्पर्धेत **तृतीय क्रमांक**.

**१८. श्रीमती जसप्रीत कौर [ज्युडो, एम.पी.एड.– द्वितीय वर्ष]**

- आंतर महाविद्यालयीन स्पर्धेत प्रथम क्रमांक.
- आंतर विद्यापीठ स्पर्धेत सहभाग.
- आंतर महाविद्यालयीन कुस्ती स्पर्धेत तृतीय स्थान

**१९. श्री. गणेश यादव [ज्युडो, एम.पी.एड.– प्रथम वर्ष]**

- आंतर महाविद्यालयीन स्पर्धेत प्रथम क्रमांक.
- आंतर विद्यापीठ स्पर्धेत सहभाग

**२०. श्रीमती प्रियांका जाधव [कुस्ती, ज्युडो, एम.पी.एड.– द्वितीय वर्ष]**

- आंतर महाविद्यालयीन ज्युडो स्पर्धेत प्रथम क्रमाक व आंतर विद्यापीठ स्पर्धेत सहभाग.
- आंतर महाविद्यालयीन कुस्ती स्पर्धेत प्रथम क्रमांक व आंतर विद्यापीठ स्पर्धेत सहभाग.

## ब.सांघिक कामगिरी:–

**१. आंतर महाविद्यालयीन योग स्पर्धा:–**

दि.१३ जानेवारी,२०१७ रोजी भिवंडी येथे झालेल्या आंतर महाविद्यालयीन योग स्पर्धेत खालील विद्यार्थी सहभागी झाले.

**चतुर्थ क्रमांक मिळविलेल्या विद्यार्थीनींची नांवे**

१. श्रीमती बंगेरा पूजा
२. श्रीमती प्रियांका मेहेर
३. श्रीमती रेश्मा सुर्वे

४. श्रीमती कांबळे श्रध्दा
५. श्रीमती प्रियांका कासारे

**पाचवा कमांक मिळविलेल्या विद्यार्थ्यांची नांवे**

१. श्री.बागल रणधीर दादासो
२. श्री.स्वप्नील शिंदे
३. श्री.गुळवी भावेश रामदास
४. श्री.अभिशेक सिंग
५. श्री.गौरांग खुरासिया

**२. आंतर महाविद्यालयीन रस्सीखेच स्पर्धा:-**

दि.३ डिसेंबर,२०१६ रोजी कॉमर्स महाविद्यालय, पनवेल येथे झालेल्या आंतर महाविद्यालयीन रस्सीखेच स्पर्धेत खालील महिला व पुरूष संघाला आठवा स्थान मिळाले.

| **पुरूष संघ पाचवा कमांक** | **महिला संघ सातवा कमांक** |
|---|---|
| १.श्री.गामी कल्पेश | १. श्रीमती स्नेहा मौर्या |
| २.श्री.विजय जोशीलकर | २. श्रीमती मेहेर प्रियांका |
| ३.श्री.वैभव कदम | ३. श्रीमती प्रणिता नाईक |
| ४.श्री.अजय कांबळे | ४. श्रीमती रोहीणी पवार |
| ५.श्री.सागर कुडळे | ५. श्रीमती समृध्दी घाग |
| ६.श्री.सागर पगारे | ६. श्रीमती छाया सरगर |
| ७.श्री.प्रसाद शिंदे | ७. श्रीमती लक्ष्मी ठांगे |
| ८.श्री.सिध्दांत पेडणेकर | ८. श्रीमती रीन मनप्रीत |
| | ९. श्रीमती शाहू शिवानी |

**३. आंतर महाविद्यालयीन ॲथलेटिक्स:-**

4 X 400 मीटर रिले स्पर्धेत पाचवे स्थान मिळविलेल्या विद्यार्थीनींचे नांवे खालीलप्रमाणे-

१. श्रीमती भाग्यश्री अग्रवाल
२. श्रीमती दिव्या पडवी
३. श्रीमती दिपाली कलमकर
४. श्रीमती रेश्मा सुर्वे

**४. आंतर महाविद्यालयीन हॉकी स्पर्धा:-**

आंतर महाविद्यालयीन हॉकी स्पर्धेत महिला संघास पाचवे स्थान.

**क.इतर सहभाग**

- आंतर महाविद्यालयीन खो-खो स्पर्धेत महाविद्यालयातील महिला व पुरूष संघाचा सहभाग.
- आंतर महाविद्यालयीन हॅण्डबॉल स्पर्धेत महाविद्यालयातील महिला व पुरूष संघाचा सहभाग.
- आंतर महाविद्यालयीन ॲथलेटिक्स स्पर्धेत महाविद्यालयातील महिला व पुरूष संघाचा सहभाग.

अहवालसाली महाविद्यालयातील एकूण ६६ विद्यार्थ्यांना त्यांच्या विविध खेळातील वैश्टियपूर्ण कामगिरीबद्दल विद्यापीठीय नियम ०.२२६ नुसार त्यांना जास्तीचे १० गुण मिळण्यास पात्र ठरले.

**१.३१ गरीब विद्यार्थ्यांना आर्थिक मदत/शिष्यवृत्ती**

१. **मराठा भगिनी समाज शिष्यवृत्ती-** दि.२६ जानेवारी २०१७ रोजी संस्थेच्या कार्यकारीणी सदस्या श्रीमती जयश्रीताई माने यांचे शुभहस्ते महाविद्यालयाच्या खालील तीन विद्यार्थीनीस प्रत्येकी रू.५,०००/-[रूपये पाच हजार फक्त] इतकी रक्कम शिष्यवृत्ती म्हणून देण्यात आली-

१. श्रीमती प्रियांका चिंतामण मेहेर
२. श्रीमती मनिषा कैलास सुर्यवंशी
३. श्रीमती पुजा रघुनाथ कुडू

२. **असोसिएशन ऑफ नॉन गव्हर्नमेंट कॉलेजेस** - सदर संस्थेच्या माध्यमातुन खालील २० महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना आर्थिक मदत म्हणून प्रत्येकी ८००/- [रूपये आठशे फक्त] प्रमाणे एकूण रू.१६,०००/-[रूपये सोळा हजार फक्त] इतकी शिष्यवृत्ती उपलब्ध करण्यात आली-

| | |
|---|---|
| १. श्रीमती बालखंडे दिपाली यशवंत | ११.श्रीमती पाटील शितल मिलिंद |
| २. श्रीमती देवकर अश्विनी अनिल | १२.श्रीमती पवार रोहिणी रमेश |
| ३. श्रीमती गायकवाड प्रगती प्रशांत | १३.श्रीमती सुर्यवंशी मनिषा कैलास |
| ४. श्रीमती कलमकर दिपाली प्रकाश | १४.श्रीमती थांगे लक्ष्मी महादेव |
| ५. श्रीमती कारभाल सुजाता नागु | १५.अडूरकर स्वप्नील लक्ष्मण |
| ६. श्रीमती खोटरे शर्मिला रावजी | १६.भुसरा अविनाथ सोमा |
| ७. श्रीमती कुडू पुजा रघुनाथ | १७.फडवले विष्णु वनशा |
| ८. श्रीमती माळी धनश्री सुनिल | १८.गगनमल्ले अनिल म्हालाप्पा |
| ९. श्रीमती मेहेर प्रियांका चिंतामण | १९.जाधव राजेश बाळू |
| १०.श्रीमती पडवी दिव्या सुरेश | २०.लेंडे बवर पांडूरंग |

३. **मुंबई विद्यापीठातर्फे आर्थिकदृष्टया गरजू विद्यार्थ्यांना मदतः-** मुंबई विद्यापीठातर्फे खालील ४ विद्यार्थ्यांना आर्थिक मदत म्हणून प्रत्येकी १०००/- [रूपये एक हजार फक्त] शिष्यवृत्ती देण्यात आली-

१. श्रीमती सुजाता कारभाल
२. श्रीमती मनिषा सुर्यवंशी
३. श्री.रणधिर बागल
४.श्री.भुसरा अविनाश सोमा

## १.३२ कॅम्पस मुलाखती

अहवालसाली विद्यार्थ्यांना नोकरी उपलब्ध व्हावी यासाठी महाविद्यालयाच्या पुढील कॅम्पस मुलाखतींचे आयोजन करण्यात आले.

- इंम्पिरिअल इंटरनॅशनल स्पोर्टस् अकॅडेमी (IISP) मालाड [पूर्व], मुंबई-६४ यांच्यावतीने दि.५ जून २०१७ रोजी.
- रन इंडिया रन, घाटकोपर, मुंबई यांच्यावतीने दि.५ जून २०१७ रोजी.
- युनिस्टार स्पोर्टस् एक्सलन्स प्रा.लि. यांच्यावतीने दि.६ जून २०१७ रोजी.

## १.३३ माजी विद्यार्थी संघटनेचे कार्य

वर्षभरात महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थी संघटनेचे केलेले कार्य कौतुकास्पद आहे. संघटनेच्या कार्यकारी समितीच्या व सर्वसाधारण सभा वेळोवेळी होवून त्यांच्यात विचारांची देवाण घेवाण झाली. माजी विद्यार्थी संघटनेच्यावतीने १९९३ सालापासून चालविण्यात येणा-या नियमित क्रीडा प्रशिक्षणाचा लाभ यावर्षी सुमारे २०० शालेय मुला-मुलींनी घेतला. आजवर प्रतिवर्षी विविध स्पर्धांमध्ये भाग घेऊन या शालेय मुलामुलींना घवघवीत यश संपादन केले आहे. क्रीडा केंद्राने २० खेळाडूंनी राज्य तर १५ खेळाडूंनी राष्ट्रीय स्तरापर्यंत नेण्याची मजल गाठली. सदर प्रशिक्षण केद्रांत प्रामुख्याने सर्वश्री दादासाहेब शिंदे, राजेंद्र शेळके, देवेंद्र पाटील, प्रेमानंद नाईक व संदीप चव्हाण हे माजी विद्यार्थी आपला अमुल्य वेळ देवून मार्गदर्शनाची कौतुकास्पद कामगिरी करीत आहेत.

## १.३४ विद्यापीठ परीक्षा निकाल

सन २०१५-१६ या शैक्षणिक वर्षात झालेल्या मुंबई विद्यापीठ परीक्षेचा निकाल नुकताच घोषित झाला असून त्यानुसार महाविद्यालयाच्या बी.पी.एड. या दोन वर्षीय अभ्यासक्रमाचा [२०१५-२०१७] प्रथम वर्षाचा निकाल १००% लागला. सदर परीक्षेस महाविद्यालयाचे एकूण ८६ विद्यार्थी बसले होते. तसेच एम.पी.एड. [२०१४-२०१६] [द्वितीय वर्ष] अभ्यासक्रमासाठी बसलेल्या २५ विद्यार्थ्यांपैकी २४ विद्यार्थी प्रथम श्रेणीत चांगल्या गुणांनी उत्तीर्ण होऊन १००% निकाल लागला. सदर परीक्षेत महाविद्यालयाची विद्यार्थीनी श्रीमती मिनाक्षी अग्रवाल एम.पी.एड. हिने मुंबई विद्यापीठात सर्वप्रथम येण्याचा मान पटकावला.

तात्पर्य, दिवसेंदिवस मुंबई शारीरिक शिक्षण मंडळाच्या शारीरिक शिक्षण महाविद्यालयाचा गुणात्मक दर्जा उंचावत आहे. आजवर मंडळाच्या या महाविद्यालयातून तयार झालेले सुमारे ३,५०० शिक्षक देशाच्या कानाकोप-यात अनेकविध शाळा-महाविद्यालयातून यशस्वीरित्या कार्य करीत आहे. आज १०० टक्के विद्यार्थ्यांना अग्रक्रमाने व प्राधान्याने नोक-या मिळताहेत. यावरून महाविद्यालयाची गुणवत्ता सिध्द होते. ही बाब संस्थेच्या दृष्टीने अत्यंत भुषणावह व अभिमानास्पद आहे. अर्थात या सर्व यशात मंडळाचे सर्व

पदाधिकारी, सभासद, महाविद्यालय व संस्थेचा कर्मचारी वृंद यांचा सिंहाचा वाटा आहे. संस्थेच्या सर्व पदाधिका-यांच्या स्वयंस्फूर्त सक्रीय सहकार्याचा आणि मार्गदर्शनाचा लाभ सदोदित होत असल्याने प्रगतीची ध्येयान्वेषी घोडदौड पुढेही अशीच सुरू रहाणार यात शंकाच नाही.

## १.३५ वार्षिक पारितोषिक वितरण व दीक्षात समारंभ –

दि.२१ एप्रिल २०१७ रोजी मुंबईचे महापौर मा.प्राचार्य श्री.विश्वनाथ महाडेश्वर यांचे प्रमुख उपस्थितीत वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ पार पडला. त्यावेळी आयोजित कार्यक्रमात महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी लेझीम, लोकनृत्य, जिम्नॅटिक्स, एरोबिक्स, टॅब्लो, झांज इ. शारीरिक व सांस्कृतिक बाबींची नेत्रदिपक प्रात्यक्षिके दाखविली तसेच मान्यवरांच्या शुभहस्ते महाविद्यालयाच्या नैपुण्यप्राप्त विद्यार्थ्यांना सन्मानित करण्यात आले. सदर समारंभास विशेष अतिथी म्हणून किर्ती महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.विष्णु मगरे, मुंबई विद्यापीठाचे माजी सिनेट सदस्य मा.श्री.महोदव जगताप, राष्ट्रीय मिल मजदूर संघाचे सरचिटणीस मा.श्री. गोविंदराव मोहिते, संस्थेचे अध्यक्ष मा.संजय शेटे, सचिव मा.श्री.दिपक शेटे व कार्यकारी समिती सदस्य श्रीमती नलिनी फडणीस, श्री.दिपक कांदळगांवकर, श्री.विजय कांबळे, श्री. शामराव मोरे, श्री.रघुनाथराव गुरव इ.मान्यवर तसेच क्रीडा प्रशिक्षण केंद्राचे विद्यार्थी–पालक आणि माजी विद्यार्थी मोठया संख्येने उपस्थित होते. समारंभात महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी व मुंबईचे महापौर मा.श्री.विश्वनाथ महाडेश्वर यांना संस्थेचे अध्यक्ष मा.श्री.संजय शेटे यांच्या शुभहस्ते शाल, पुष्पगुच्छ व गौरवपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. सदर प्रसंगी क्रीडा क्षेत्रात वैयक्तिक व सांघिक विशेष कामगिरी केलेल्या महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांना तसेच बीपीएड, एमपीएड अभ्यासक्रमाच्या वर्षभरात झालेल्या आंतरकुल व मैदानी स्पर्धेमध्ये विजयी व उपविजयी पुरूष व महिला कुलास इन्ट्राम्युरल चॅम्पियनशिप, ॲथलेटिक्स चॅम्पियनशिप व जनरल चॅम्पियनशिपचे चषक देवून आणि क्रीडा प्रशिक्षण केंद्रातील राज्य व राष्ट्रीय स्पर्धेत विशेष कामगिरी करणा-या खेळाडूंना रोख बक्षिसे व भेटवस्तू देऊन मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले. अहवालसाली शारीरिक शिक्षण विषयात मुंबई विद्यापीठाची विद्यावाचस्पती मिळविणा-या ९ संशोधकांनादेखिल याप्रसंगी गौरविण्यात आले.

मुंबई विद्यापीठाच्या सेमिस्टर परीक्षेच्या शेवटच्या दिवशी म्हणजे दि.२५ मे २०१७ रोजी बीपीएड द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांचा दीक्षांत समारंभ आयोजित करण्यात आला. त्यावेळी सर्व विद्यार्थ्यांनी शपथ घेऊन शारीरिक शिक्षण क्षेत्रात निष्ठेने कार्य करण्याचा संकल्प केला.

# २. क्रीडा प्रशिक्षण केंद्राचे कार्य

अहवालसाली संस्थेच्या क्रीडा प्रशिक्षण केंद्राच्या २३ व्या वर्षी [सन२०१५-१६] आयोजित केलेल्या विविध उपक्रमांबाबत तसेच विविध स्पर्धांमध्ये भाग घेवून खेळाडूंनी दाखविलेल्या कामगिरीचा थोडक्यात अहवाल पुढीलप्रमाणे–

## २.१ २३ वे वासंतिक क्रीडा प्रशिक्षण शिबिर

दि.१४ ते २८ एप्रिल,२०१६ या कालावधीत मुंबई शारीरिक शिक्षण मंडळाच्या विद्यमाने आयोजित केलेल्या २२ व्यावासंतिक क्रीडा प्रशिक्षण शिबिरात जिम्नॅस्टिक्स, मल्लखांब आणि योग या क्रीडा प्रकारांमध्ये एकूण ११० शालेय व महाविद्यालयीन मुला-मुलींनी सहभाग घेतला.

प्राचार्य डॉ.गो.वि.पारगांवकर यांच्या मार्गदर्शनाखाली श्री.दादासाहेब शिंदे, श्री.देवेंद्र पाटील, श्री.फिरोज बेळगांवकर, श्री.प्रेमानंद नाईक, श्री.राजेंद्र शेळके, संदिप चव्हाण यांनी शिबिरार्थींना प्रशिक्षण दिले. शिबिराचा समारोप समारंभ दि.२८ एप्रिल,२०१६ रोजी सायंकाळी ६.३० वा. श्रीमती सोनाली सावंत, आंतरराष्ट्रीय जिम्नॅस्टिक्स पंच कु. अक्षता शेटे व क्रीडा केंद्राचे संचालक डॉ.गो.वि.पारगांवकर यांच्या उपस्थितीत संपन्न झाला. यावेळी उत्कृष्ठ शिबिरार्थींना प्रशस्तीपत्र व बक्षिसे देवून त्यांचा गौरव करण्यात आला.

## २.२ प्रगत प्रशिक्षण शिबिर

दि. १ मे ते ३० मे,२०१६ या कालावधीत दररोज सकाळी ८ ते १० व सायंकाळी ६ ते ९ या वेळेत प्रगत वासंतिक प्रशिक्षण शिबिर आयोजन करण्यात आले. यामध्ये आर्टिस्टिक्स व ॲक्रोबेटिक्स जिम्नॅस्टिक्सचे प्रशिक्षण श्री.फिरोज बेळगांवकर व श्री. तन्मय घाणेकर, कु.शिवानी दौंड यांनी दिले. श्री.दादासाहेब शिंदे यांनी समन्वयक म्हणून कार्य केले.

## २.३ २६ वी मुंबई महापौर चषक जिम्नॅस्टिक्स स्पर्धा

दि.२१ व २२ मे,२०१६ रोजी बृहन्मुंबई महानगरपालिका पुरस्कृत मुंबई शहर जिम्नॅस्टिक्स असोसिएशन व मुंबई शारीरीक शिक्षण मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने

२६ वी मुंबई महापौर चषक राष्ट्रीय आर्टिस्टीक व रिदमिक जिम्नॅस्टिक्स अजिंक्यपद स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. भारतातील २२ नामवंत संघांनी या स्पर्धेत आपला सहभाग नोंदविला. स्पर्धेचे उद्घाअन स्थानिक नगरसेविका श्रीमती डोके तर समारोप समारंभ उपमहापौर श्रीमती शैलजा गिरकर यांच्या उपस्थितीत संपन्न झाला.

## २.४ नियमित क्रीडा प्रशिक्षण

दि.१२ जून,२०१६ पासून संस्थेच्या नियमित क्रीडा प्रशिक्षण केंद्राची सुरूवात झाली. यामध्ये एकूण १५० विद्यार्थी प्रशिक्षणाचा लाभ घेत आहेत. संस्थेचे सचिव श्री. संजय शेटे व प्राचार्य डॉ.गो.वि. पारगांवकर [संचालक, क्रीडा प्रशिक्षण केंद्र] यांच्या मार्गदर्शनाखाली श्री.दादासाहेब शिंदे, श्री.देवेंद्र पाटील, श्री.फिरोज बेळगांवकर, श्री. राजेंद्र शेळके, श्री.संदीप चव्हाण, श्री.प्रेमानंद नाईक हे प्रशिक्षक नियमित प्रशिक्षणाचे कार्य करत आहेत.

## २.५ मुंबई शहर जिल्हा जिम्नॅस्टिक्स निवड स्पर्धा

दि.८, ९ सप्टेंबर व १६ ऑक्टोंबर,२०१६ रोजी भारतीय क्रीडा मंदिर, वडाळा येथे व नोव्हेंबर २०१६ रोजी राजीव गांधी क्रीडा संकुल धारावी येथे संपन्न झालेल्या आर्टिस्टिक ॲक्रोबॅटिक्स व ट्रॅम्पोलिन टम्बलिंग प्रकारात निवड स्पर्धेत मंडळाच्या एकूण ४८ खेळाडूंनी सहभाग घेतला. त्यापैकी ४२ खेळाडूंची मुंबई शहर जिल्हा संघात राज्य अजिंक्यपद जिम्नॅस्टिक्स स्पर्धेसाठी निवड झाली.

## २.६ मुंबई शहर शालेय जिम्नॅस्टिक्स स्पर्धा

दि.१५ ऑक्टोंबर,२०१६ रोजी भारतीय क्रीडा मंदिर, वडाळा येथे संपन्न झालेल्या आर्टिस्टीक व ॲक्रोबॅटिक्स जिम्नॅस्टिक्स स्पर्धेमध्ये व दि.१६ नोव्हेंबर २०१६ रोजी राजीव गांधी क्रीडा संकुल, धारावी येथे झालेल्या शालेय जिल्हा निवड स्पर्धेत संस्थेतील २२ खेळाडूंनी त्यांच्या शाळा व कनिष्ठ महाविद्यालयातर्फे सहभाग घेतला. त्यामधून पुढील १२ खेळाडूंची विभागीय स्पर्धेकरीता निवड झाली

१. आदित्य फडणीस
२. यश परदेशी
३. वेदांग सरदार
४. पंकज सावंत
५. शिवम पाल
६. वेदांगी खडे
७. भुमिका ढोणे
८. क्षितिजा वाघमारे
९. साईराज पवार
१०.देवेश शाह
११.अनुक्षी कदम
१२.साक्षी पवार

## २.७ २२ वी ॲक्रोबेटिक्स जिम्नॅस्टिक्स राज्य अजिंक्यपद स्पर्धा

दि. २४ सप्टेंबर, २०१६ रोजी गुरू गोविंदसिंगजी स्टेडीयम, नांदेड येथे संपन्न झालेल्या राज्य अजिंक्यपद ॲक्रोबॅटिक्स स्पर्धेत संस्थेच्या १० खेळाडूंनी मुंबई शहराचे प्रतिनिधीत्व करून चांगली कामगीरी केली.

- ज्युनिअर गट

१.देवेश शाह }
२.साईराज पवार } पुरूष दुहेरी - सुवर्ण

१.अनुश्री कदम }
२.देवश शाह } मिक्स दुहेरी - सुवर्ण

१.पंकज सावंत }
२.यश परदेशी } पुरूष समुह - सुवर्ण
३.शिवम पात्य }
४.वेदांग सरदार }

- सिनिअर गट

१.तन्मय घाणेकर }
२.शिवानी दौंड } मिक्स दुहेरी- डायनॅमिक-सुवर्ण, कंबाईन-सुवर्ण, बॅलन्स-रौप्य

## २.८ ११ वी ट्रॅम्पोलिन/टम्बलिंग राज्य अजिंक्यपद स्पर्धा.

दि.२४ जानेवारी,२०१६ रोजी जिल्हा क्रीडा संकुल, परभणी येथे संपन्न झालेल्या राज्य अजिंक्यपद स्पर्धेत संस्थेच्या पुढील ६ खेळाडूंनी मुंबई शहरचे प्रतिनित्व करून चांगली कामगिरी केली. श्री.दादासाहेब शिंदे यांनी प्रशिक्षक म्हणून कार्य केले.

१. यश परदेशी - १४ वर्षाखालील मुले- ट्रॅम्पोलिन - सुवर्ण
२. शिवम पाल - १४ वर्षाखालील मुले- ट्रॅम्पोलिन - रौप्य
३. रिध्दी हरिया - १७ वर्षाखालील मुली- ट्रॅम्पोलिन - सुवर्ण, टम्बलिंग-सुवर्ण
४. शिवानी दौंड- १७ वर्षाखालील मुली- ट्रॅम्पोलिन - सुवर्ण

## २.९ ५१ वी आर्टिस्टिक्स जिम्नॅस्टिक्स राज्य अजिंक्यपद स्पर्धा

दि.२५ व २६ ऑक्टोंबर,२०१६ रोजी श्री शिवछत्रपती क्रीडा नगरी,बालेवाडी, पुणे व दि.५ व ६ नोव्हेंबर २०१६ रोजी प्रबोधनकार ठाकरे क्रीडा संकुल, विलेपार्ले येथे झालेल्या राज्य अजिंक्यपद स्पर्धेत संस्थेतील मंडळाच्या १२ खेळाडूंनी मुंबई शहराचे प्रतिनिधित्व करून खालीलप्रमाणे उत्कृष्ठ कामगीरी केली. या स्पर्धेमध्ये संस्थेचे प्रशिक्षक श्री.दादासाहेब शिंदे, श्री.राजेंद्र शेळके, श्री.फिरोज बेळगांवकर व कु.अक्षता शेटे यांनी पंच कार्य केले.

१. कु.वेदांत देशमुख- १२ वर्षाखालील मुले
   कु.साईराज पवार- सांघीक - कांस्य
२. कु.वेदांगी खैरे- १२ वर्षाखालील मुली- टेबल वॉल्ट- कांस्य
३. कु.आदित्य फडणीस- १४ वर्षाखालील मुले- टेबल वॉल्ट-रौप्य, रोमन रिंग- कांस्य
४. कु.पृथ्वीराज फडणीस- १७ वर्षाखालील मुले- टेबल वॉल्ट-कांस्य, हॉरिझन्टल बार-रौप्य, सर्वसाधारण- रौप्य.
५. कु.दर्शन घाणेकर-१७ वर्षाखालील मुले - पोमेल हॉर्स-कांस्य, पॅरलल बार्स-कांस्य, टेबल वॉल्ट-कांस्य.
६. कु.प्रसाद अवेरे- सांघिक-सुपर्ण

## २.१० १२ वी ट्रॅम्पोलिन व टम्बलिंग जिम्नॅस्टिक्स राज्य अजिंक्यपद स्पर्धा

दि.२५ व २६ ऑक्टोंबर २०१६ रोजी श्री शिवछ्पती क्रीडा नगरी, बालेवाडी, पुणे येथे झालेल्या राज्य अजिंक्यपद ट्रॅम्पोलिन व टम्बलिंग जिम्नॅस्टिक्स स्पर्धेत संस्थेतील ११ खेळाडूंनी मंबई शहरचे प्रतिनिधित्व करून चांगली कामगिरी केली.

कु.यश परदेशी- १४ वर्षाखालील मुले-ट्रॅम्पोलिन-रौप्य
कु.रिध्दी वीरा-ज्युनिअर मुली-ट्रॅम्पोलिन-रौप्य
कु.रिध्दी हरीया-ज्युनिअर मुली-ट्रॅम्पोलिन-सुवर्ण
कु.शिवानी दौंड-सिनिअर मुली- ट्रॅम्पोलिन-सुवर्ण, टम्बलिंन-सुवर्ण

## २.११ मुंबई विभाग शालेय जिम्नॅस्टिक्स स्पर्धा

दि. १९ व २० नोव्हेंबर, २०१६ रोजी सरस्वती क्रीडा संकुल, नौपाडा, ठाणे व दि. २२ नोव्हंबर,२०१६ रोजी राजीव गांधी क्रीडा सकुल, धारावी येथे संपन्न झालेल्या विभागीय जिम्नॅस्टिकस स्पर्धेत संस्थेच्या १२ खेळाडूंनी सहभाग घेतला. त्यापैकी पुढील खेळाडूंची राज्यस्तरीय शालेय अजिंक्यपद स्पर्धेकरीता निवड झाली.

१. आदित्य फडणीस
२. पंकज सावंत
३. यश परदेशी
४. शिवम पाल
५. वेदांग सरदार

## २.१२ शालेय राज्य अजिंक्यपद जिम्नॅस्टिक्स स्पर्धा

दि.७ ते ११ डिसेंबर, २०१६ रोजी श्री शिवछत्रपती क्रीडा नगरी, बालेवाडी, पुणे येथे संपन्न झालेल्या राज्य अजिंक्यपद शालेय जिम्नॅस्टिक्स स्पर्धेत संस्थेच्या पुढील खेळाडूंनी चांगली कामगिरी केली.

१. आदित्य फडणीस- १७ वर्षाखालील मुले-सांघिक-सुवर्ण
   स्टील रिंग-रौप्य, पोमेल हॉर्स-कांस्य
२. पंकज सावंत,यश परदेशी, वेदांग सरदार,शिवम पाल- पुरूष समुह कांस्य

### २.१३ २७ वी रिदमिक जिम्नॅस्टिक्स राज्य अजिंक्यपद स्पर्धा

दि.१२ व १४ नोव्हेंबर,२०१६ रोजी जिल्हा क्रीडा संकुल, जळगांव येथे महाराष्ट हौशी जिम्नॅस्टिक्स संघटना आयोजित २७ व्या रिदमिक जिम्नॅस्टिक्स राज्य अजिंक्यपद स्पर्धेत संस्थेतील ४ खेळाडूंनी मुंबई शहरचे प्रतिनिधित्व करून चांगली कामगीरी केली.

कु.वजेसा ठक्कर-८ वर्षाखालील मुली, वैयक्तिक-सुवर्ण, फ्री हॅन्ड-सुवर्ण, सांघिक- सुवर्ण
कु.समृध्दी घोष-१० वर्षाखालील मुली, वैयक्तिक-रौप्य, सांघिक-सुवर्ण
कु.भूमिका ढोणे- १२ वर्षाखालील मुली, हूप-रौप्य, सांघिक-सुवर्ण, रोप-सुवर्ण
कु.प्रिशा धरमशी- सांघिक सुवर्ण

या स्पर्धेत कु.अक्षता शेटे हिने पंच म्हणून कार्य केले.

### २.१४ क्वीन्स कप रिदमिक जिम्नॅस्टिक्स अजिंक्यपद निमंत्रित स्पर्धा

दि.१७ व १८ डिसेंबर २०१६ रोजी हॉगकॉग येथे झालेल्या क्वीन्स कप २०१६ या निमंत्रित रिदमिक जिम्नॅस्टिक्स स्पर्धेत ८ खेळाडूंनी मंडळाचे प्रतिनिधीत्व केले. त्या स्पर्धेत त्यांनी मलेशिया, सिंगापूर, हॉगकॉगच्या जिम्नॅस्टिशी स्पर्धा करून चांगली कामगीरी केली. कु.अक्षता शेटे यांनी प्रशिक्षक म्हणून कार्य केले.

विनया करंगुटकर- सर्वसाधारण कांस्य, बॉल कांस्य, क्लब सातवा क्रमांक
समृध्दी घोष - रिबन चतुर्थ, रोप पाचवी, हूप सहावी
वनेसा ठक्कर- रोप पाचवी, रिबन सहावी
भार्गवी भोसले- रोप आठवी
गौतमी तेली- बॉल सातवी
प्रिशा धरमशी- क्लब चतुर्थ, बॉल पाचवी
क्षितिजा वाघमारे- बॉल चतुर्थ, क्लब सहावी, रिबन सहावी
मैथिली कांबळी- क्लब चतुर्थ, रिबन पाचवी

### २.१५ ६२ वी राष्ट्रीय शालेय जिम्नॅस्टिक्स अजिंक्यपद स्पर्धा

दि.६ ते १० जानेवारी,२०१७ रोजी आयपीएससी सोनीपत, हरियाणा येथे झालेल्या ६२ व्या राष्ट्रीय शोलय जिम्नॅस्टिक्स अजिंक्यपद स्पर्धेत कु.आदित्य फडणीस याने महाराष्ट्र संघातून सांघिक सुवर्णपदक पटकाविले.

### २.१६ अखिल भारतीय आंतर-विद्यापीठ जिम्नॅस्टिक्स अजिंक्यपद स्पर्धा

दि.१ ते ५ फेब्रुवारी,२०१७ रोजी पंजाबी विद्यापीठ, पतियाळा येथे संपन्न झालेल्या अखिल भारतीय आंतर विद्यापीठ जिम्नॅस्टिक्स अजिंक्यपद स्पर्धेत संस्थेतील खेळाडू कु.प्रसाद अवेरे व कु.दर्शन घाणेकर यांनी आर्टिस्टीक जिम्नॅस्टिक्समध्ये मुंबई विद्यापीठाचे प्रतिनिधित्व केले.

### २.१७ मुंबई शहर जिल्हा जिम्नॅस्टिक्स अजिंक्यपद स्पर्धा

मुंबई शहर जिम्नॅस्टिक्स असोसिएशन आयोजित मुंबई शारीरिक शिक्षण मंडळ पुरस्कृत १० वी आर्टिस्टिक, ९ वी रिदमिक व ६ वी ॲक्रोबॅटिक्स, ट्रॅम्पोलिन व टम्बलिंग जिम्नॅस्टिक्स अजिंक्यपद स्पर्धा दि.१९, २४, २६ फेब्रुवारी,२०१७ आणि दि. २,५ मार्च २०१७ या दिवशी भारतीय क्रीडा मंदिर वडाळा व राजीव गांधी क्रीडा संकुल, धारावी येथे संपन्न झाल्या. या स्पर्धेत संस्थेच्या क्रीडा प्रशिक्षण केंद्रांतील खेळाडूंनी सुवर्ण, रौप्य व कांस्य पदके जिंकून घवघवीत यश संपादित केले.

### २.१८ ११ व्या मिनी राज्यस्तरीय टॅलेंट डिस्प्ले स्पर्धा

दि. ४ मार्च,२०१७ रोजी आपल्या संस्थेच्या क्रीडांगणात मुंबई शहर जिम्नॅस्टिक्स असोसिएशन आयोजित मुंबई शारीरिक शिक्षण मंडळ पुरस्कृत ११ व्या मिनी टॅलेंट डिस्प्ले स्पर्धेत संस्थेच्या नवोदित खेळाडूंनी सहभाग घेवून चांगली कामगीरी केली. या स्पर्धेत मुंबई, ठाणे व रायगड जिल्हयाच्या विविध भागातील १५०० खेळाडूंनी उत्साही सहभाग घेतला.

### २.१९ एफआयजी आंतरराष्ट्रीय रिदमिक जिम्नॅस्टिक्स राज्यस्तरीय पंचवर्ग

दि. २६ ते ३० जानेवारी २०१७ रोजी अझरबजन जिम्नॅस्टिक्स संघटनेच्यावतीने बाकू आयोजित फेडरेशन ऑफ इंटरनॅशनल जिम्नॅस्टिक्स रिदमिक जिम्नॅस्टिक्स पंच वर्गात संस्थेच्या प्रशिक्षिका कु.अक्षता शेटे यांनी वैयक्तिक व ग्रुप या

दोन्ही प्रकारात कटगरी -३ व ४ चे ब्रेवहेट प्राप्त करून भारतातील सर्वोत्तम कामगिरी केली. केले.

## ३. शालेय लेझीम स्पर्धा

कै. दत्ताराम लाड फिरत्या चषकाच्या शालेय लेझीम स्पर्धा प्रतिवर्षाप्रमाणे दि.१६ डिसेंबर, २०१६ रोजी झाल्या. स्पर्धेत ११ शाळांतील सुमारे १००० शालेय मुला-मुलींनी भाग घेतला. या स्पर्धेत स्वामी विवेकानंद विद्यामंदिर, दत्तनगर, डोंबिवली (पूर्व) या शाळेने प्रथम क्रमांक पटकावून कै.दत्ताराम लाड चषक, स्मृतिचिन्ह व पाच हजार रूपयांचे बक्षीस मिळविले. शिवाजी शिक्षणोत्तेजक मंडळ, अभ्युदयनगर, काळाचौकी या शाळेने द्वितीय क्रमांक मिळवून स्मृतिचिन्ह व तीन हजार रूपयांचे बक्षीस मिळविले. एन.आर.सी. स्कूल, मोहोने, कल्याण, या शाळेने तृतीय क्रमांकासह दोन हजार रूपये व स्मृतिचिन्ह पटकावले. सोशल सर्विस लीग, परेल, शाळेने चतुर्थ क्रमांकाचे उत्तेजनार्थ स्मृतिचिन्ह मिळविले व सहभागी झालेल्या सर्व शाळांना सहभाग प्रमाणपत्रे देण्यात आली. त्याचबरोबर उत्कृष्ठ ढोलवादक- कु.आकाश सकपाळ, शिवाजी शिक्षणोत्तेजक मंडळ शिवाजी विद्यालय, काळाचौकी, उत्कृष्ठ हलगीवादक- विवेक शिंदे, शिवाजी शिक्षणोत्तेजक मंडळ शिवाजी विद्यालय, काळाचौकी, उत्कृष्ठ ताशावादक- शिवम म्हामुणकर, स्वामी विवेकानंद विदयामंदिर, अरूणोदय, डोंबिवली (पश्चिम) यांनाही गौरविण्यात आले.

स्पर्धेचे उद्‌घाटनप्रसंगी प्रमुख पाहुणे छत्रपती शिवाजी विद्यालयाच्या [धारावी] मुख्याध्यापिका मा.सौ.विना दोलवलकर, मुंबई शारीरिक शिक्षण मंडळाचे अध्यक्ष मा. संजय बाबूराव शेटे, राष्ट्रीय मिल मजदूर संघाचे सरचिटणीस गांविंदराव मोहिते, शिवछत्रपती पुरस्कार विजेते लिलाधर चव्हाण, शारीरिक शिक्षण महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.गो.वि.पारगांवकर, मुंबई शारीरिक शिक्षण मंडळाचे सदस्य सर्वश्री प्रभाकर पानसरे, दिपक कांदळगांवकर, विजय कांबळे, श्रीमती नलिनी फडणीस, शारीरिक शिक्षण महाविद्यालयाचे सर्व शिक्षक, स्पर्धाप्रमुख डॉ.रोहिणी चंद्रकांत कवडे आदि मंडळी उपस्थित होती.

स्पर्धेबाबत आपला अभिप्राय देतांना लेझीम तज्ञ डॉ.गो.वि. पारगांवकर यांनी सांगितले की, लेझीम स्पर्धेसाठी प्रतिसाद वाढत असला आणि त्याचा दर्जाही सुधारत असला तरी त्याची फिल्मी लेझीमकडे वाटचाल न होता लेझीमचा पारंपारिक बाज व नजाकत टिकविण्याची शिक्षक बंधु-भगिनींनी भविष्यात काळजी घ्यावी. तसेच लेझीमची ढोल, ताशा, झांज, घुमकं, तुतारी ही मुळ वाद्ये वापरावीत. एकूणच स्पर्धा खूपच रंगल्या. पुढेही त्या अशाच रंगत रहाणार यात शंकाच नाही. स्पर्धेचा सविस्तर निकाल पुढीलप्रमाणे -

| क्र. | ‘kkGsps ukao | xq.k 100 iSdh |
|---|---|---|
| १ | स्वामी विवेकानंद विद्यामंदिर, दत्तनगर, डोंबिवली पूर्व | 78-33 |
| २ | शिवाजी शिक्षणोत्तेजक मंडळ, काळाचौकी | 76-66 |
| ३ | एल.आर.सी. स्कूल, मोहोने, कल्याण | 71-66 |
| ४ | सोशल सर्व्हिस लीग, परेल | 70-00 |
| ५ | स्वामी विवेकानंद विद्यामंदिर, अरूणोदय, डोंबिवली पश्चिम | 69-66 |
| ६ | गौरीदत्त विदयामंदिर, सायन | 54-66 |
| ७ | छत्रपती शिवाजी विदयालय, धारावी | 53-00 |
| ८ | गांधी मेमोरियल हायस्कूल, माटूंगा | ५०.०० |
| ९ | कुमुद विद्यामंदिर, गोवंडी | ४६.३३ |
| १० | रामलिंगम एज्युकेशन फॉडेशन इग्लिश हायस्कूल अॅड ज्यु. कॉलेज, गोवंडी | ४५.६६ |
| ११ | ऑर्किड्स दी इंटरनॅशनल स्कूल, मस्जिद बंदर, मुंबई | ४४.३३ |

## ४. हिंद करंडक स्पर्धा

दरवर्षीप्रमाणे यावर्षी मुंबई शारीरिक शिक्षण मंडळाने ७४ व्या आंतरशालेय हिंद करंडक स्पर्धेचे आयोजन दि.१० ते १३ जानेवारी,२०१७ या कालावधीत केले. स्पर्धेचे उद्‌घाटन रा.मि.म. संघाचे श्री.गोविंदराव मोहिते यांच्या हस्ते करण्यात आले. तसेच

श्री.रिशांत देवाडिगा, सौ.वैशाली लोंढे, श्रीमती अक्षता शेटे इ.मान्यवर विशेष अतिथी म्हणून उपस्थित होते. सदर स्पर्धेत एकूण ४६ शाळांच्या सुमारे १५०० खेळाडूंनी सहभाग घेतला. या स्पर्धेत १५ वर्षाखालील आंतरशालेय मुला-मुलींच्या कबड्डी, खो-खो व लंगडी या खेळाचे आयोजन करण्यात आले. सदर स्पर्धेचा निकाल पुढीलप्रमाणे-

खो-खो [मुले] -प्रथम क्रमांक - रा.फ.नाईक विद्यालय, कोपरखैराने
द्वितीय क्रमांक - महात्मा गांधी विद्यामंदिर, वांद्रे
तृतीय क्रमांक - के.एम.एस.डॉ.शिरोडकर हायस्कूल, परेल
उत्कृष्ठ खेळाडू कु.अभिषेक शिंदे, रा.फ.नाईक विद्यालय, कोपरखैरने

खो-खो [मुली] - प्रथम क्रमांक - रा.फ.नाईक विद्यालय, कोपरखैराने
द्वितीय क्रमांक- महात्मा गांधी विद्यामंदिर, वांद्रे
तृतीय क्रमांक - सरस्वती मंदिर हायस्कूल, माहिम
उत्कृष्ठ खेळाडू - कु.पुजा फरगडे, रा.फ.नाईक विद्यालय, कोपरखैरने

कबड्डी [मुले] - प्रथम क्रमांक - शारदाश्रम विद्यामंदिर, दादर
द्वितीय क्रमांक -रा.फ.नाईक विद्यालय, कोपरखैराने
तृतीय क्रमांक - के.एम.एस.डॉ.शिरोडकर हायस्कूल, परेल
उत्कृष्ठ खेळाडू - कु.अभिषेक जाधव, शारदाश्रम विद्यामंदिर, दादर

कबड्डी [मुली] -प्रथम क्रमांक - महात्मा गांधी विद्यामंदिर, वांद्रे
द्वितीय क्रमांक - लक्ष्मी विद्यालय, ठाणे
तृतीय क्रमांक - आर.एम.नाईक विद्यालय, कोपनखैरने
उत्कृष्ठ खेळाडू- कु.करीना कामटेकर महात्मा गांधी विद्यामंदिर,वांद्रे

लंगडी [मुले] - प्रथम क्रमांक - डॉ.त्रि.रा.नरवणे विद्यालय, कांदिवली
द्वितीय क्रमांक - शारदाश्रम विद्यामंदिर, दादर
तृतीय क्रमांक - शिशु विकास मंदिर, कांदिवली
उत्कृष्ठ खेळाडू - कु.साहिल भाये, डॉ.त्रि.रा. नरवणे विद्यालय, कांदिवली

लंगडी [मुली] - प्रथम क्रमांक - महात्मा गांधी विद्यामंदिर, वांद्रे
द्वितीय क्रमांक -के.एम.एस.डॉ.शिरोडकर हायस्कूल, परेल
तृतीय क्रमांक - डॉ.त्रि.रा.नरवणे विद्यालय, कांदिवली
उत्कृष्ठ खेळाडू - कु.ऋतुजा जाधव, महात्मा गांधी विद्यामंदिर,वांद्रे

सन २०१६-१७ या वर्षातील **टोपीवाला हिंद करंडकाचे मानकरी शाळा रा.फ. नाईक विद्यालय, कोपरखैरणे असून राणी लक्ष्मीबाई हिंद करंडळाचे मानकरी शाळा महात्मा गांधी विद्यामंदिर, वांद्रे ही शाळा झाली.** सदर स्पर्धेत सर्व खेळातील प्रथम क्रमांक पटकाविणा-या शाळेस रोख रू.२,०००/- व स्मृतिचिन्ह, प्रमाणपत्र प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते देण्यात आले. द्वितीय क्रमांक पटकावणा-या शाळेस रू.१,०००/- रोख व स्मृतिचिन्ह, प्रमाणपत्र प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले. तसेच उत्कृष्ठ खेळाडूंना डॉ.काशिनाथ दादाराव ढोकरट यांच्या स्मृतीप्रित्यर्थ प्रत्येकी रू.५००/- रोख व स्मृतीचिन्ह, प्रमाणपत्र प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते देण्यात आले.

७४ व्या वर्षात पदार्पण करणा-या यावेळच्या हिंद करंडक स्पर्धांचे वैशिष्टय म्हणजे मुंबई शारीरिक शिक्षण मंडळाचे अध्यक्ष मा.संजय शेटे यांच्या कल्पनेतून शालेय मुलांच कबड्डी स्पर्धा प्रो कबड्डीच्या नियमानुसार खेळविल्या गेल्या. विजेत्यांना रोख स्वरूपात बक्षिसे देण्यात आली तसेच हिंद करंडक स्पर्धेत उत्कृष्ठ कबड्डी खेळणा-या मुलांचे १२ संघ तयार करून त्यांना विविध पुरस्कर्ते मिळवून मे महिन्यात त्यांच्या स्पर्धा घेण्यात आल्या. पुढील वर्षाच्या अहवालात [सन २०१७-१८] त्याचा वृत्तांत देण्यात येईल. पुढील वर्ष हिंद करंडक स्पर्धांचे अमृत महोत्सवी वर्ष असून सदर स्पर्धांचे भव्य आयोजन करण्याचा संस्थेचा मानस आहे.

तसेच स्पर्धेच्या पारितोषिक वितरण समारंभासाठी मंडळाचे प्रमुख कार्यवाह श्री. संजय शेटे, खजिनदार श्री.दिपक शेटे तसेच मंडळाचे कार्यकारी सभासद सर्वश्री प्रभाकर पानसरे, दिपक कांदळगांवकर, नलिनी फडणीस, श्री.एन.बी.मोटे, उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा संचालनालय मुंबई विभाग, महाराष्ट्र टाईम्सचे क्रीडा पत्रकार व मुंबई मराठी पत्रकार संघाचे कार्यकारी सदस्य श्री.महेश विचारे, दैनिक लोकसत्ताचे पत्रकार व मुंबई क्रीडा पत्रकार संघटनेचे सचिव श्री.प्रशांत केणी, आयडियल स्पोर्टस ॲकॅडेमीचे अध्यक्ष श्री.लिलाधर चव्हाण तसेच महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ.ढाकणे,

स्पर्धा समन्वयक डॉ.घ.का. ढोकरट व महाविद्यालयाचे संचालक डॉ.पारगांवकर हे उपस्थित होते.

### ५. कबड्डी जिल्हा अजिंक्यपद स्पर्धा

प्रतिवर्षाप्रमाणे मुंबई शहर कबड्डी असोसिएशन आयोजित व मुंबई शारीरिक शिक्षण मंडळ पुरस्कृत जिल्हा अजिंक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धा किशोर /किशोरी, कुमार/कुमारी, व्यावसायिक विशेषगट, व्यावसायिक प्रथम व द्वितीय श्रेणी, स्थानिक प्रथम श्रेणी, स्थानिक द्वितीय श्रेणी, स्थानिक तृतीय श्रेणी, महिला अशा विविध गटात घेण्यात आल्या. किशोर व कुमार कट राष्ट्रीय कबड्डी स्पर्धेची तारीख लवकरच जाहीर झाल्यामुळे कुमार-कुमारी गट स्पर्धा दि. १५ ऑक्टोंबर ते २८ आक्टोंबर,२०१६ या कालावधीत मुंबई शारीरिक शिक्षण मंडळाच्या सहकार्याने भारतीय क्रीडा मंदिर, वडाळा येथे घेण्यात आल्या. स्पर्धेचे उद्‌घाटन मुंबई शारीरिक शिक्षण महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.गो.वि. पारगांवकर यांच्या शुभहस्ते झाले. याप्रसंगी संघटनेचे सर्व सन्माननीय पदाधिकारी व कार्यकारीणी सदस्य उपस्थित होते.

### ६. होळी उत्सवाचे आयोजन

दि.१२ मार्च २०१७ रोजी संस्थेच्यावतीने प्रतिवर्षाप्रमाणे होळी उत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी संस्थेचे अध्यक्ष मा.श्री.संजय शेटे यांनी होळीचे पुजन करून होळी पेटविली. त्यावेळी संस्थेचे पदाधिकारी श्री.दिपक शेटे, श्रीमती अनुराधा शेटे, संग्रामसिंह शेटे, क्रीडा प्रशिक्षण केंद्राचे पालक, विद्यार्थी, स्थानिक नागरिक, डॉ.गो.वि. पारगांवकर इत्यादी मोठया संख्येने उपस्थित होते.

### ७. लंगडी पंच वर्ग व पंच परीक्षा

अहवालसाली मंडळाच्यावतीने महाविद्यालयाने लंगडी खेळाचे पंचवर्ग व पंच परीक्षेचे आयोजन केले होते. त्यात महाविद्यालयाच्या १०० शिक्षक-प्रशिक्षणार्थ्यांनी भाग घेतला.

### ८. योग अभ्यास केंद्र

संस्थेच्यावतीने भारतीय क्रीडा मंदिरात प्राचार्य गो.वि. पारगांवकर यांच्या पुढाकारामुळे व मार्गदर्शनाखाली सुरू करण्यात आलेल्या योगाभ्यास केंद्रामध्ये श्री.दिलिप पोदार, श्रीमती सुनिता बसिन व श्रीमती हर्षा निसार यांनी योग शिक्षक म्हणून शिक्षकांचे कार्य करून संस्थेस सहकार्य केले. रोज सकाळी ६.३० ते ७.३० यावेळेत चालविण्यात आलेल्या योगासन वर्गाचा लाभ सुमारे ३० ते ३५ स्थानिक स्त्री-पुरूषांनी घेतला.

### ९. व्यायामशाळा

अहवालसाली भारतीय क्रीडा मंदिराच्या दुस-या मजल्यावरील अद्यावत व्यायामशाळेचा लाभ महाविद्यालयाचे विद्यार्थी-विद्यार्थीनी, क्रीडा प्रशिक्षण केंद्राचे विद्यार्थी-विद्यार्थीनी व सुमारे १५० स्थानिक पुरूष व महिलांनी घेतला.

### १०. इतर संस्थांचे क्रीडा विषयक, शैक्षणिक व सामाजिक उपक्रम

अहवालसाली संस्थेच्या भारतीय क्रीडा मंदिरात विविध क्रीडा संस्था, मंडळे, शाळा, महाविद्यालये, सामाजिक संस्था, मुंबई महानगरपालिका, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, मुंबई शहर आणि महाराष्ट्र शासन यांनी आयोजित केलेल्या खालील स्पर्धा आणि कार्यक्रम पार पडले.

- मुंबई शहर जिल्हा जिम्नॅस्टिक निवड स्पर्धा दि. ८ व ९ ऑक्टोबर तसेच दि.१५ व १६ ऑक्टोबर २०१६
- मुंबई शहर जिल्हा क्रीडा अधिकारी, जिम्नॅस्टिक निवड स्पर्धा दि.१५ ऑक्टोबर २०१६
- महाराष्ट्र हौशी जिम्नॅस्टिक्स संघटना, कार्यकारीणी समिती व तांत्रिक समिती सभा दि.१० एप्रिल २०१६.
- मुंबई शहर जिम्नॅस्टिक्स असोसिएशन कार्यकारीणी समिती सभा दि.१९ एप्रिल २०१६.
- मुंबई शहर जिम्नॅस्टिक्स असो., २६ वी मुंबई महापौर चषक राष्ट्रीय जिम्नॅस्टिक्स अजिंक्यपद स्पर्धा दि.२० मे व २१ मे २०१६.
- दि सातारा सहकारी बॅक, कारकुन व अधिकारी परीक्षा, बढती व चर्चासत्र दि.२१ मे ते १२ जून २०१६
- श्री.प्रभाकर उर्फ दादा अमृते शोकसभा दि.२९ जून २०१६
- मुंबई शहर कबड्डी असोसिएशन सर्वसाधारण सभा - दि.३ जुलै,२०१६
- मुंबई खो-खो संघटना, अखिल भारतीय खो-खो पंचपरीक्षा दि.७ ऑगष्ट २०१६

- दि सातारा सहकारी बॅक मर्यादित, विशेष सर्वसाधारण सभा दि.६ ऑगष्ट २०१६
- एम आर मॅनेजमेंट कन्सल्टन्सी प्रायव्हेट लिमिटेड, परीक्षा दि.११ सप्टेंबर २०१६
- दि सातारा सहकारी बॅक द्वारा आयोजित कै.बाबुरावजी शेटे २५ वी पुण्यतिथी दि.१९.९. २०१६
- कै.भ.स.घाग शोकसभा, बजरंग क्रीडा मंडळ, मुं.शा.शि.मंडळ व बीडीडी चाळ रहिवासी संघद्वारा, दि.१८ सप्टेंबर २०१६
- मुंबई शहर कबड्डी असो.द्वारा आयोजित कबड्डी पंचशिबिर दि.२५ सप्टेंबर २०१६
- महाराष्ट्र शासन, जिल्हा क्रीडा अधिकारी, मुंबई द्वारा आयोजित जिल्हास्तरीय शालेय कबड्डी स्पर्धा दि.२६ ते ३० सप्टेंबर २०१६
- मुंबई शहर कबड्डी असोसिएशनद्वारा आयोजित जिल्हा अंजिक्यपद निवड चाचणी- दि. १५ ते २८ ऑक्टोंबर,२०१६.
- मुंबई शहर व्हॉलीबॉल असो., जिल्हा अजिंक्यपद स्पर्धा व सराव शिबिर- दि.२२ व २३ ऑक्टों. आणि २४ ते २९ नोव्हेंबर,२०१६
- मुंबई स्कूल स्पोर्टस असो.द्वारे आयोजित आंतरशालेय जिम्नॅस्टिक्स स्पर्धा- दि.२२, २६, २७ नोव्हेंबर व दि.१०, ११ डिसेंबर,२०१६.
- मुंबइ शहर जिम्नॅस्टिक असोसिएशन कार्यकारीणी सभा दि.२० जानेवारी २०१७
- मुंबई शहर जिम्नॅस्टिक असोसिएशन जिल्हा अजिंक्यपद स्पर्धा दि.१९ फेब्रुवारी, २ मार्च व ५ मार्च २०१७
- मुंबई शहर जिम्नॅस्टिक असो., वार्षिक सर्वसाधारण सभा दि.१९ फेब्रुवारी २०१७ लेक्चर हॉल
- मुंबई शहर कबड्डी असो., पंचवर्ग-पंचपरीक्षा- दि.२३ ते २९ जानेवारी,२०१७
- योगविद्या निकेतन, दादर, योग कार्यशाळा दि.५ ते ११ फेब्रुवारी २०१७
- ॲमॅच्युअर कबड्डी फेडरेशन ऑफ इंडिया, राष्ट्रीय खेळाडू निवड दि.२१ ते २३ फेब्रुवारी २०१७
- मुंबई शहर कबड्डी असो., खेळाडू निवड दि.२१, २२, व २३ फेब्रुवारी २०१७
- मुंबई शहर तालिम संघ, २१ वी ग्रिकोरोमन राजय अजिंक्यपद स्पर्धा दि.२४ ते २६ फेब्रुवारी २०१७.
- मुंबई शहर कबड्डी असो. मुंबई महापौर चषक स्पर्धा दि.२० मार्च ते २६ मार्च २०१७
- मुंबई शहर जिम्नॅस्टिक्स असोसिएशन, आयोजित टॅलेंट डिसप्ले व जिल्हा अजिंक्यपद स्पर्धा- ४ मार्च,२०१७.
- दि महाराष्ट्र अर्बन को.ऑप.बॅक्स फेडरेशन सर्वोत्कृष्ठ बॅक पुरस्कार वितरण सोहळा दि.६ मार्च २०१७
- मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, सभा दि.२४ मार्च २०१७

अशाप्रकारे भारतीय क्रीडा मंदिराचे स्टेडियम, क्रीडांगण, व्यायाम शाळा आणि वसतिगृह यांचा खेळ, शिक्षण, तसेच समाज व राष्ट्रोपयोगी कार्यासाठी जास्तीत जास्त उपयोग व्हावा म्हणून मुंबई शारीरिक शिक्षण मंडळ सतत प्रयत्नशील आहे.

**११. श्रध्दांजली:-**

अहवालसाली मंडळाशी संबंधित तसेच देशभरातील ज्या नामवंत व थोर व्यक्तींचे निधन झाले, त्या सर्वांना मंडळाच्यावतीने भावपूर्ण श्रध्दांजली. त्यात प्रामुख्याने श्री.टोनी कोझीअर माजी वेस्टइंडिज क्रिकेटपटू (११ मे, २०१६), श्री.मुहम्मद अली, बॉक्सींग आयकॉन (३ जून २०१६), श्रीमती सुलभा देशपांडे, ज्येष्ठ सिनेमा अभिनेत्री (४ जून २०१६), श्री.दादा अमृते मुंशाशिमंडळाचे सदस्य (१९ जून २०१६), श्री.आर सी ढेरे, मराठी साहित्यातील विद्वान (२ जूलै २०१६), श्रीमती मुबारक बेगम, पाश्चात्य गायिका (१८ जूलै २०१६), पंडीत लच्छु महाराज, प्रसिध्द तबला वादक (२८ जूलै २०१६), श्री.टीकेव्ही देसिकचर, चेन्नईचे प्रसिध्द योग गुरू (८ ऑगष्ट, २०१६), श्री.शरद राव, कामगार नेते (१ सप्टेंबर, २०१६), श्री.दिलिप पाडगांवकर, माजी पत्रकार (२५ नोव्हेंबर २०१६), श्री.फिडेल कॅस्ट्रो, क्युबाचे क्रांतिकारी नेते (२५ नोव्हेंबर २०१६), श्री.आनंद यादव, मराठी लेखक (२७ नोव्हेंबर २०१६), श्रीमती जे. जयललिता, तमिळनाडूच्या मुख्यमंत्री (५ डिसेंबर २०१६), श्री.ओम पुरी, सिनेअभिनेता(५ जानेवारी २०१७), श्री.तारक मेहता, गुजराथी लेखक (१ मार्च २०१७).

या सर्वांच्या आत्म्यास चिरशांती लाभो अशी मुंबई शारीरिक शिक्षण मंडळाच्यावतीने परमेश्वर चरणी प्रार्थना !!

## १२. आभार

वर्षभरात विविध प्रसंगी विविध क्षेत्रातील अनेक नामवंत तज्ञ आणि थोर व्यक्तींनी संस्थेस वेळोवेळी भेटी देऊन मार्गदर्शन केले तसेच होत असलेल्या कार्याचे कौतुक करून आम्हास प्रेरणा दिली. संस्थेच्या विविध उपक्रमात सहभागी होऊन अनेक शाळा, संस्था आणि व्यक्तींनी मंडळास सहकार्य केले. महाराष्ट्र राज्य

शासनाच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागाकडून तसेच विद्यापीठ अनुदान आयोगाकडून महाविद्यालय व संस्थेला अनुदानरूपाने आर्थिक सहकार्य मिळाले. अनेक व्यक्ती आणि संस्थांनी मंडळाच्या उपक्रमांसाठी आर्थिक आधार दिला, त्या सर्वांचे मन:पूर्वक आभार. मुंबई शारीरिक शिक्षण मंडळाचा उत्कर्ष आपणा सर्वांवर अवलंबून आहे, याची जाणीव मंडळाला सदैव आहे. बलशाली भारताचे स्वप्न उराशी बाळगून कार्य कारणा-या आणि अमृत महोत्सवी वर्षाकडून शताब्दी वर्षाकडे वाटचाल करीत असलेल्या आमच्या मुंबई शारीरिक शिक्षण मंडळास आपण भविष्यातही सहकार्य करावे ही विनंती.

आपला नम्र,

दिपक बाबूराव शेटे
जनरल सेक्रेटरी,
मुंबई शारीरिक शिक्षण मंडळ